


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १०१ • पुणे • मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

# प्रशांत जगताप राष्ट्रवादीला ठोकणार रामराम

## पुण्यात राजकीय भूकंप! शरद पवारांना मोठा धक्का

- शहराध्यक्ष प्रशांत जगताप राजीनामा देणार
- दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यास केला तीव्र विरोध
- शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांची भेट घेणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
महापालिका निवडणुकीपूर्वी पुण्यात मोठी राजकीय घडामोड घडली. पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसला. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. दोन्ही राष्ट्रवादीच्या एकत्र येण्यास त्यांनी विरोध केला आहे. त्यामुळे नाराज झालेल्या प्रशांत जगताप यांनी मोठा पाऊल उचलत शरद पवारांची साथ सोडण्याचा निर्णय घेतला. थोड्याच वेळात ते शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांची भेट घेणार आहेत. यासाठी ते मुंबईला रवाना झालेत. प्रशांत जगताप राजीनामा देणार असल्यामुळे पुण्यातील राष्ट्रवादीच्या कार्यालयात शांतात पाहायला मिळत आहे.

प्रशांत जगताप यांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यास विरोध केला. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असतील तर मी पक्ष सोडणार असल्याची भूमिका प्रशांत जगताप यांनी घेतली होती. त्यांनी यासंदर्भातला प्रस्ताव देखील पक्षासमोर मांडला होता. त्यानंतर नाराज झालेल्या प्रशांत जगताप यांनी शहराध्यक्ष पदाचा राजीनाम देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी राजीनामा दिला तर पुण्यात पालिका निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला रामराम ठोकल्यानंतर प्रशांत जगात दुसऱ्या पक्षात प्रवेश करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. दोन दिवसांत प्रशांत जगताप निर्णय जाहीर करणार असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, पुण्यात पालिका निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. दोन राष्ट्रवादी एकत्र येण्यावर स्थानिक पातळीवर निर्णय होणार आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून आज सुद्धा पुणे शहरातील नेते एकत्र बैठक घेणार आहेत. या बैठकीत जागांच्या संख्येवर चर्चा केली जाणार आहे. कुठल्या जागेवर कुठल्या राष्ट्रवादीच्या उमेदवाराला तिकीट दिले जाऊ शकतं यावर देखील चर्चा होणार आहे. बैठकीत महाविकास आघाडीमध्ये एकूण जागांच्या शेअरिंगबद्दल सुद्धा चर्चा होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येण्यासाठी एक पाऊल पुढे आहेत. आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुण्यामधील ३ नेते उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट घेण्याची शक्यता आहेत. वंदना चव्हाण, अंकुश काकडे आणि विशाल तांबे आज अजित पवारांची भेट घेण्याची शक्यता आहे. पुण्यातल्या बारामती होस्टेलमध्ये हे तीन नेते अजित पवारांची घेणार भेट आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रस्ताव घेऊन तिन्ही नेते अजित पवारांना भेटणार आहेत. राज्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येऊन निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

## 'अक्कलकोटचे मायलेक रेल्वेच्या धडकेत ठार'; अंत्यविधीसाठी गावी गेले अन्..



**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**
लोहमार्ग ओलांडताना रेल्वेची धडक बसून माय-लेकाचा मृत्यू झाला. ही घटना पिंपरी चिंचवडमधील कासारवाडी रेल्वे स्थानकावर सोमवारी (ता. २२) पहाटे ही दुर्घटना घडली.कविता अर्जुन चव्हाण (वय ३०) व आरव अर्जुन चव्हाण (वय ४, दोघेही रा. शिरोली, चाकण) अशी मृतांची नावे आहेत.

हे कुटुंब मुळचे अक्कलकोटमधील वसंतराव नाईक नगरचे रहिवासी आहेत. दहा वर्षांपूर्वी अर्जुन चव्हाण कामानिमित्त चाकणला आले. ते एका खासगी कंपनीत कामाला असून कविता या गृहिणी होत्या. त्यांचा लहान मुलगा आरव घरीच असायचा, तर अकरा वर्षांचा मोठा मुलगा विराज इयत्ता पाचवीत शिकत आहे.

चार दिवसांपूर्वी हे कुटुंब जवळच्या नातेवाईकाच्या अंत्यविधीसाठी मूळ गावी गेले होते. त्यानंतर ते परत येत होते. कासारवाडी रेल्वे स्थानकावर उतरल्यानंतर चाकणला जाण्यासाठी त्यांना स्थानकाबाहेर जायचे होते.

रेल्वेच्या धडकेत गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या माय-लेकावर पिंपरीतील स्मशानभूमीत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

कासारवाडी रेल्वे स्थानकावर उतरल्यानंतर अर्जुन चव्हाण लघुशंकेसाठी गेले होते. कविता, विराज व आरव लोहमार्ग ओलांडत होते. विराज पलीकडे गेला. मात्र, कविता व आरव यांच्यावर काळाने घाला घातला.

## ठळक बातम्या



### प्रसिद्ध अभिनेत्रीचा संसार मोडला

**पुणे (आरंभ पर्व) : लोकप्रिय अभिनेत्री , मॉडेल हिने लग्नाच्या 16 वर्षांनंतर घटस्फोट घेतला आहे. सोशल मीडियावर पोस्ट करून तिने ही बातमी आपल्या चाहत्यांना दिली आहे. ही अभिनेत्री म्हणजे श्रीनंदा शंकर. श्रीनंदा सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. ती एक इन्फ्लुएन्सर देखील आहे. श्रीनंदा शंकरच्या नवऱ्याचे नाव गेव सत्तारवाला असे आहे. श्रीनंदा आणि गेवने लग्नाच्या 16 वर्षांनी घटस्फोट घेतला आहे. अभिनेत्री श्रीनंदाने सोशल मीडियावर एक भावुक पोस्ट शेअर केली आहे. "गेव आणि मी अधिकृतपणे वेगळे झालो आहोत..." असे म्हणत तिने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. घटस्फोटानंतर आम्ही चांगले आणि शांत आयुष्य जगत असल्याचे तिने सांगितले. तसेच त्यांच्या गोपनीयतेचा आदर ठेवण्याची विनंती तिने केली आहे. त्यानंतर श्रीनंदाने एक व्हिडीओ देखील पोस्ट केला आहे. श्रीनंदाच्या पोस्टवर नेटकरी कमेंट्स करताना दिसत आहे. तसेच तिला पाठिंबा देत आहेत.**

## ...तर मंगल कार्यालये, सभागृहे, लॉन्समध्ये विवाह बंद!

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**
सिंहगड- शहरातील मंगल कार्यालये, सभागृहे तसेच लॉन्समध्ये होणाऱ्या विवाह व इतर समारंभांमुळे ध्वनिप्रदूषणासह वायू व घनकचरा प्रदूषणात मोठी वाढ होत असल्याची गंभीर दखल राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (NGT) घेतली आहे. याबाबत न्यायाधिकरणाने २०१५ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला (MPCB) ठोस कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. या आदेशानुसार प्रदूषण नियंत्रण मंडळाने विशेष समिती स्थापन करून मंगल कार्यालये, सभागृहे आणि लॉन्ससाठी स्वतंत्र नियमावली तयार केली आहे. या नियमावलीनुसार संबंधित आस्थापनांना मंडळाकडून ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) घेणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. आवश्यक परवानगीशिवाय विवाह व इतर सार्वजनिक समारंभ आयोजित केल्यास संबंधित आस्थापनांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. वायुप्रदूषणामुळे मानवी



- ना-हरकत प्रमाणपत्राची सक्ती

आरोग्यासह पर्यावरणाला धोका निर्माण होत असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या निर्णयानंतर पर्यावरणप्रेमींनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करत, "गल्लीपासून दिल्लीपर्यंत कोणतेही मंगल कार्यालय असो किंवा घरगुती समारंभ असोत, सर्व ठिकाणी प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांची सक्तीने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे," अशी भूमिका मांडली आहे.

## पुणे महापालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

- २२ कक्ष, ४०१२ मतदान केंद्रे, २३ हजार कर्मचारी
- आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी महापालिकेची संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा युद्धपातळीवर काम करत असून निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. निवडणूक पारदर्शक, शांततापूर्ण आणि नियमबद्ध पद्धतीने पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून विविध स्तरांवर काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहरात १५ निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले असून, प्रत्येक निर्णय अधिकाऱ्यासाठी १५ सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी (१, २ व ३) नेमण्यात आले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांची कार्यालये





निश्चित करण्यात आली असून, निवडणूक कामकाजासाठी एकूण २२ स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षांसाठी १५ नोडल अधिकारी तसेच निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावरही २२ कक्षांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उमेदवारांना महापालिकेतील विविध विभागांकडील ना-हरकत व थकबाकी प्रमाणपत्रे सहज मिळावीत, यासाठी पुणे महापालिकेने संगणक प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. उमेदवारांना आता एकाच ठिकाणी अर्ज करून किंवा ऑनलाइन पद्धतीने ही प्रमाणपत्रे प्राप्त करता येणार आहेत. तसेच प्रचारासाठी आवश्यक असलेले वाहन परवाना, तात्पुरते प्रचार कार्यालय, कोपरा सभा, जाहीर सभा आदी परवाने मिळविण्यासाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात येत आहेत. ही प्रक्रिया अधिक सोपी व जलद व्हावी यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्याचे काम सुरू आहे. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी १६० पोलिसांची नियुक्ती करण्यात येणार असून, याबाबत पोलिस विभागास कळविण्यात आले आहे.

मतदान प्रक्रियेसाठी केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी (१, २, ३) मिळून सुमारे २३ हजार कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश पारित करण्यात आले आहेत. शहरातील ४१ प्रभागांमध्ये एकूण ४०१२ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली असून, प्रत्येक ठिकाणी स्ट्राँग रूम, मतदान साहित्य वाटप व स्वीकृती केंद्रांची व्यवस्था संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून केली जात आहे. अंतिम मतदार यादीच्या आधारे मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या तयार करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

## श्वानाने घाण केल्यास जबाबदारी श्वान मालकाचीच

- महापालिकेचा इशारा; नियमभंग केल्यास दंडात्मक कारवाई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
शहरातील सार्वजनिक स्वच्छता आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणून, सार्वजनिक ठिकाणी श्वानाने (कुत्र्याने) घाण केल्यास त्याची पूर्ण जबाबदारी श्वानमालकावरच असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. रस्ते, उद्याने, फुटपाथ, सोसायटी परिसर अशा ठिकाणी श्वानाची घाण न उचलल्यास संबंधित मालकावर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. महानगरपालिका नियमांनुसार पाळीव श्वान फिरवताना स्वच्छतेची काळजी घेणे बंधनकारक आहे. श्वानाने घाण केल्यानंतर ती ताबडतोब उचलून योग्य ठिकाणी टाकणे हे श्वानमालकाचे कर्तव्य आहे. मात्र, अनेक ठिकाणी या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. पुणे महानगरपालिकाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सार्वजनिक ठिकाणी घाण केल्यामुळे दुर्गंधी, संसर्गजन्य आजारांचा धोका आणि नागरिकांना चालताना होणारा त्रास वाढतो. त्यामुळे अशा प्रकारांकडे सार्वजनिक उपद्रव म्हणून पाहिले जाते. नियमभंग आढळल्यास श्वानमालकांवर २०० ते ५०० रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येऊ शकतो. पुनरावृत्ती झाल्यास अधिक कठोर कारवाई केली जाईल. दरम्यान, नागरिकांनीही अशा प्रकारांची तक्रार महापालिकेकडे करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी श्वानमालकांनी नियमांचे पालन करणे गरजेचे असून, स्वच्छता ही केवळ प्रशासनाचीच नव्हे तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.




# आदित्य ठाकरेंच्या उपस्थितीने खडकवासल्यात उत्साह

### आदेश बांदेकरांच्या होम मिनिस्टर कार्यक्रमास हजारो महिला भगिनींचा खडकवासल्यात महापूर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला परिसरात शनिवारी आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते. शिवसैनिक संदीप पाटील बुवा मते यांच्या वाढदिवसानिमित्त 'खेळ मांडियेला होम मिनिस्टर' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मधली तालीम ट्रस्ट आणि जय भवानी प्रतिष्ठान यांच्या वतीने हा कार्यक्रम श्री मुकाईमाता मंदिराजवळ पार पडला.

या कार्यक्रमासाठी युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी उपस्थिती लावली. त्यांना पाहण्यासाठी आणि शुभेच्छा देण्यासाठी शिवणे, खडकवासला आणि धायरी परिसरातील हजारो महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आदित्य ठाकरेंच्या आगमनावेळी महिलांनी टाळ्यांचा कडकडाट करत आनंद व्यक्त केला.

यावेळी बोलताना आदित्य ठाकरे





म्हणाले की, संदीप मते हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर काम करणारे निष्ठावान शिवसैनिक आहेत.

समाजासाठी ते सातत्याने काम करत असून त्यांच्या कार्याची दखल घ्यावी लागते, असेही त्यांनी सांगितले. सुमारे सात हजार महिलांना मोफत उज्जैन येथील श्री महाकालेश्वर दर्शन यात्रा घडवून आणल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

महाराष्ट्राचे लाडके भाऊजी आदेश बांदेकर यांनी सादर केलेल्या होम मिनिस्टर कार्यक्रमामुळे वातावरण अधिकच आनंदी झाले.

खेळ, गाणी, नृत्य आणि मनोरंजन यामुळे उपस्थित महिलांनी मनमुराद आनंद घेतला. कार्यक्रमात प्रथम क्रमांकाच्या विजेत्या महिलेला 'एक्टिवा' दुचाकी व पैठणी देण्यात आली. तसेच लकी ड्रॉद्वारे इलेक्ट्रिक स्कुटी, फ्रिज, वॉशिंग मशीन, टीव्ही, शिलाई मशीन, मिक्सर, इस्त्री, गिझर, पिठाची गिरणी, वॉटर प्युरिफायर अशी अनेक बक्षिसे देण्यात आली.

या कार्यक्रमाला शहर व जिल्ह्यातील अनेक मान्यवर, पदाधिकारी, शिवसैनिक आणि नागरिक उपस्थित होते. संदीप मते यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित हा कार्यक्रम केवळ उत्सव न राहता, महिलांसाठी आनंदाचा आणि समाजातील आपुलकी वाढवणारा सोहळा ठरला.

यावेळी शिवसेना नेते संदीप मते यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्याबद्दल सर्व मान्यवरांचे आभार मानले.. आपल्या सर्वांचे प्रेम असेच कायमस्वरूपी मिळावे अशी साद यावेळी घातली..

# राजगुरुनगर नगरपरिषदेवर एकनाथ शिंदेंचा झेंडा

## नगराध्यक्षपदी मंगेश गुंडाळ : नगराध्यक्षपदासह १० नगरसेवक शिंदे शिवसेनेचे

**राजगुरुनगर -किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**



येथील राजगुरुनगर नगरपरिषदेच्या सन २०२५ ते २०३० च्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना- एकनाथ शिंदे गटाचे मंगेश वंसतराव गुंडाळ यांनी लोकनियुक्त नगराध्यक्ष पदावर बाजी मारली. या निवडणूकीत शिवसेनेचे १०, राष्ट्रवादी ५, भाजप ४ तर अपक्ष २ नगरसेवक निवडून आले आहेत. यावेळी प्रथमच जनतेतून लोकनियुक्त नगराध्यक्ष अशा स्वरूपाची निवडणूक झाली. माजी जिल्हा परिषद सदस्य व नव्यानेच शिवसेना- एकनाथ शिंदे गटात प्रवेश केलेल्या अतुल देशमुख यांच्या नियोजनातून झालेल्या या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह १० जागा मिळविण्यात शिंदे सेनेला यश मिळाले.

राजगुरुनगर नगरपरिषेदेची मतमोजणी येथील खेड तालुका क्रीडा संकुलात रविवारी (दि.२१) सकाळी दहा वाजता सुरु झाली व दिड तासात निकाल हाती येऊ लागले. मंगेश गुंडाळ हे प्रत्येक फेरीत आघाडीवर होते. विजयी मंगेश गुंडाळ यांना ७८४८ मते मिळाली आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट ) किरण चंद्रकांत आहेर यांना ५७५० मते मिळाली आहेत. भाजपाचे शिवाजी नंदकुमार मांदळे यांना ३०७० मते मिळाली आहेत. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे बापू किसन थिगळे यांना ९३९ मते मिळाली आहेत. तर अपक्ष गणेश लक्ष्मण इंगवले यांना ५५ मते मिळाली आहेत. तसेच नोटा ११८ मते आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी शैलजा पाटील व मुख्याधिकारी अंबादास गर्कळ यांनी सर्व यंत्रणा चोखपणे राबवली होती. या निवडणूकीत नगरसेवकपदी सुनंदा थिगळे (अपक्ष), किशोर थिगळे (अपक्ष ), कुमार सांडभोर (भाजपा), राजश्री सांडभोर (शिवसेना), स्नेहल राक्षे (राष्ट्रवादी ), दिनेश सांडभोर (राष्ट्रवादी), राजेंद्र जाधव (भाजप), सिद्धी शेळके (शिवसेना), मनोहर सांडभोर (शिवसेना), ज्योती वाडेकर (शिवसेना), अमोल वाळुंज (शिवसेना), श्वेता ढोले (शिवसेना), कल्पना आढारी (शिवसेना), वैभव घुमटकर(राष्ट्रवादी), सुप्रिया घुमटकर (राष्ट्रवादी), निलेश घुमटकर (भाजपा), आशा गुंडाळ (शिवसेना), आश्विनी आवटे (शिवसेना), फैज मोमिन(भाजपा), मित्रसेन डोंगरे( राष्ट्रवादी ),सुप्रिया पिंगळे (शिवसेना) हे निवडून आले आहेत.

विजयी उमेदवारांची कार्यकर्ते व नागरीकांनी जल्लोषात मिरवणूक काढून स्वागत केले.

## ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर फॅशनमध्ये घडवत आहे नवीन क्रांती

या दौऱ्याची सांगता कोलकाता येथे हस्तकलेच्या एका धाडसी नवीन सादरीकरणाने झाली, ज्याने फॅशनच्या पुढील वाटचालीस आकार दिला.

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**




ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरने या वर्षीच्या पर्वाची सांगता केली, ज्यात फॅशनच्या पारंपरिक संकल्पनांना मोडून काढणारी एक अभूतपूर्व फॅशन कथा सादर करण्यात आली. प्रतिष्ठित हावडा पुलाच्या भव्य पार्श्वभूमीवर आणि शहराच्या ऐतिहासिक हुगळी नदीला एका आलीशान रनवेमध्ये रूपांतरित करून, या अंतिम पर्वात डिझायनर अनामिका खन्ना AK | OK यांचे प्रायोगिक कलेक्शन सादर करण्यात आले. यामध्ये करिश्माई ईशान खट्टर शोस्टॉपर होता, ज्याने डिझाइनला पारंपरिक चौकटींच्या पलीकडे नेले आणि फॅशनला एका नवीन युगात पोहोचवले.

फॅशन डिझाइन कौन्सिल ऑफ इंडिया (FDCI) च्या सहकार्याने सादर केलेल्या या प्रदर्शनाने कारागिरीबद्दलच्या जुन्या समजुतींना आव्हान दिले, आणि तिला एक स्थिर परंपरा न मानता एक जिवंत, विकसित होणारी शक्ती म्हणून सादर केले. अनामिका खन्नाच्या AK | OK ने परिचित पारंपरिक कला प्रकारांना – जरदोझी, चिकनकारी आणि आरसाकाम – वेगळे करून, भविष्यवेधी शिलाई, मेटॅलिक इंटरव्हेंशन आणि कॉस्मिक इन्सपायर्ड ग्राफिक्सद्वारे त्यांना पुन्हा एकत्र आणले.

हा कार्यक्रम हुगळी नदीच्या मध्यभागी नांगरलेल्या एका तराफ्यावर सादर झाला, ज्यामुळे त्याचे एका तरंगत्या फॅशन थिएटरमध्ये रूपांतर झाले. कार्यक्रमाची सुरुवात पाणबुड्यांनी तराफ्यावर येण्याने झाली आणि प्रकाश, धूर व आवाजाच्या साहाय्याने उभारणीला जिवंतपणा देण्यात आला. उत्साही संगीतावर मॉडेल्स रचनेतून बाहेर येऊ लागले. त्यांच्या प्रत्येक पावलासोबत लेझर लाईट्स हालचाल करत होत्या, ज्यामुळे शोमधील उत्सुकता आणि ऊर्जा वाढत गेली. शो ने खरा कळस गाठला तो मजबूत चेनमेल पोशाखांच्या सादरीकरणाने, जे एकसंध आणि प्रभावी वाटत होते. त्यानंतर हालचालीत साकारलेल्या शिल्पासारख्या पोशाखांनी लक्ष वेधले. शेवटी, ईशानच्या स्पीडबोटमधून झालेल्या भव्य प्रवेशाने शोचा शानदार शेवट झाला, आणि हावडा ब्रिजच्या पार्श्वभूमीवर सर्व मॉडेल्स एकत्र येत समारोप झाला.

## नेतृत्वबदलाची घोषणा; गोपाळ विठ्ठल यांची पदोन्नती

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**



गेल्या १३ वर्षांपासून गोपाळ विठ्ठल यांनी भारती एअरटेलचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी पदाची जबाबदारी समर्थपणे पेलली आहे. ऑक्टोबर २०२४ रोजी कंपनीच्या सुनियोजित उत्तराधिकार प्रक्रियेचा भाग म्हणून गोपाळ विठ्ठल यांची भारती एअरटेलच लिमिटेडच्या उपाध्यक्षपदीदेखील नियुक्ती करण्यात आली होती. या बदल पक्रियेचा भाग म्हणून आता कंपनीच्या नेतृत्वात बदल करण्यात आले आहेत. गोपाल विठ्ठल यांच्याजागी शाश्वत शर्मा यांची कंपनीचे नियोजित मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नव्या वर्षांत शर्मा या नव्या पदाचा कार्यभार स्विकारतील. व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून यशस्वीरित्या काम पाहणा-या गोपाल विठ्ठल यांची पदोन्नती झाल्याचे कंपनीच्यावतीने जाहीर करण्यात आले आहे. १ जानेवारी २०२६ पासून गोपाळ विठ्ठल कंपनीच्या कार्यकारी उपाध्यक्ष पदाची सूत्रे सांभाळतील.

## कॅलिफोर्निया बदामांसह प्रत्येक ख्रिसमस क्षण खास बनवा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



ख्रिसमस केवळ काही दिवसांवर आहे, जो उत्साह, उबदारपणा आणि सणासुदीतील आनंदाची खात्री घेऊन येतो. हिवाळ्याचा हाच काळ आपल्याला स्वादिष्ट पदार्थांचा अनुभव घेण्यासाठी आणि अर्थपूर्ण क्षण साजरे करण्यासाठी प्रेरित करतो. यंदा, कॅलिफोर्निया बदामांच्या पोषक गुणधर्मांसह आपल्या सणाच्या जेवणात आणि भेटवस्तूंच्या परंपरांमध्ये अधिक सुंदरता जोडा. नैसर्गिकरीत्या १५ आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असलेले बदाम, खाण्याचा समाधानकारक कुरकुरीतपणा देतात, हृदयाचे आरोग्य सुधारतात, दीर्घकालीन ऊर्जा देतात आणि भूक नियंत्रित करण्यात मदत करतात, जे सणांच्या भेटी, भरपूर जेवण आणि प्रवासाच्या महिन्यात विशेषतः उपयुक्त आहे. कॅलिफोर्नियातील बदामांची बहुमुखी प्रतिभा ही त्यांची एक प्रमुख ताकद आहे. संपूर्ण खाल्लेले, चिरलेले किंवा चिरलेले असले तरी, ते प्रत्येक पदार्थाचा पोत आणि चव वाढवतात.

## नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये भाजप पुन्हा नंबर १ चा पक्ष

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विकासाभिमुख राजकारण व प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संघटन, रणनीती आणि नेतृत्वाचा विजय**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे विकासाभिमुख राजकारण व भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे संघटन कौशल्य आणि अचूक निवडणूक नियोजन यांच्या जोरावर भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रात प्रथमच नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक निकालात अभूतपूर्व असे यश मिळवले आहे. महाराष्ट्रातील भाजपा कार्यकर्त्यांच्या मुखातून देवेंद्र आणि रविंद्र या जोडगोळीचा नेहेमी होणार आदरार्थी उल्लेख आजच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांनी आज सार्थ ठरवला. यंदाच्या निवडणुकीत प्रचारगीतातून गाजलेले "तुमची आमची भाजपा सर्वांची" हे बोल महाराष्ट्रातील जनतेने खरे करून दाखवले, हे या निकालावरून सिद्ध झाल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. रविंद्र चव्हाण यांनी सहा महिन्यांपूर्वी प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा हाती घेतल्यानंतर अतिशय शिस्तबद्धपणे आणि संयम व आक्रमकपणाच्या अनोख्या शैलीतून महाराष्ट्र पिंजून काढला. यादरम्यान अनेक दिग्गज नेते त्यांनी भाजपात आणले. कोकणात वर्चस्व असलेल्या रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाचा खरंतर या निवडणुकांच्या निमित्ताने कस लागला, त्यात रविंद्र चव्हाण पैकीच्या पैकी गुणांनी उत्तीर्ण झाल्याचे आज स्पष्ट झाले. राज्यात अनेक ठिकाणी शिंदेसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्याशी भाजपाची लढत होती. मात्र देवेंद्र फडणवीस यांच्या चातुर्यामुळे आणि रविंद्र चव्हाण यांच्या संघटन कौशल्यामुळे अनेक ठिकाणी लढत जिंकली.

मात्र त्याचवेळी राज्यात सत्तास्थानाला किंवा महायुतीला बाधा पोहोचणार नाही, याचं गणित देवेंद्र फडणवीस आणि रविंद्र चव्हाण यांनी एकत्रितपणे अचूक सोडवले. याबरोबरच सेनेच्या आणि राष्ट्रवादीच्या दुसऱ्या फळीला भाजपने त्यांची जागाही दाखवली असे दिसते. श्रीकांत शिंदे यांच्याशी असलेले रविंद्र चव्हाण यांचे प्रेम व तिरस्कार असे दुहेरी संबंध गेल्या काही दिवसांतील भाजपा पक्ष प्रवेशामुळे अधिक गहिरे होतील का?, अशी शक्यता आजच्या निकालांमुळे झाली आहे. जानेवारीत होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांच्या बाबतीतही देवेंद्र-रविंद्र यांची किमया चालेल अशीच शक्यता अधिक असल्याने मात्र महायुतीतील सहकारी पक्ष आता कशी व्यूहरचना करतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# लोल्लापलूझा इंडिया २०२६ चा आनंद द्विगुणित होणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



आपल्या पहिल्यावहिल्या जागतिक लाईव्ह म्युझिक पार्टनरशिपचा भाग म्हणून एअरबीएनबी २४ आणि २५ जानेवारी रोजी मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्स येथे होणाऱ्या लोल्लापालूझा इंडिया २०२६ मध्ये पाहुण्यांना एक त्यांच्या आवडत्या संगीताच्या जवळ आणणारा एक खास अनुभव देईल. हा भारतातील एअरबीएनबीसाठी एक रोमांचक नवीन अध्याय आहे, जो पर्यटन, संस्कृती आणि सर्जनशीलतेद्वारे लोकांना एकमेकांशी जोडण्याच्या वचनबद्धतेला बळकटी देतो.

बॅकस्टेज टूर्स आणि कलाकारांकडून ज्ञानवर्धक सर्जनशील सत्रांपासून ते लोल्लापालूझा इंडिया इनसाइडरच्या माध्यमातून बिहाइंड दि सीन प्रवेशापर्यंत प्रत्येक अनुभव भारतातील सर्वात सुंदर संगीत महोत्सवांपैकी एकाच्या निर्मितीमागील प्रयत्नांची एक अविस्मरणीय झलक देतो.

“लाइव्ह संगीत आणि प्रवास नेहमीच एकमेकांसोबत चालले आहेत - चाहते महोत्सवांना फक्त उपस्थित राहत नाहीत, तर ते त्यांचे आयोजन करणाऱ्या शहरांचा शोध घेतात आणि एकमेकांशी नाते जोडतात. त्यातून आपल्या एखाद्या शहराच्या अनुभवाची व्याख्या निर्माण होते,” असे एअरबीएनबीचे भारत आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत बजाज म्हणाले. "लोलापालूझासोबतची आमची भागीदारी या खास एअरबीएनबी अनुभवांच्या माध्यमातून चाहत्यांना त्या जगाच्या जवळ आणते. त्यामुळे या महोत्सवाचा अनुभव फक्त चाहते म्हणून नव्हे तर त्यांच्या कथेचा भाग असलेल्या व्यक्ती म्हणून घेण्याची दुर्मिळ संधी मिळते."

भारतातील ख्यातनाम गायक-गीतकार, संगीतकार आणि कथाकारांपैकी एक असलेल्या अंकुर तिवारींसोबत पडद्यामागील अनुभव घेता येईल. हा खास एअरबीएनबी अनुभव चाहत्यांना अंकुरच्या सर्जनशील जगात प्रवेश करण्यासाठी आमंत्रित करतो. चाहत्यांना दुर्मिळ बॅकस्टेज अनुभव मिळेल, त्याच्या प्रदर्शनपूर्व उपक्रमांचा भाग होता येईल आणि त्यासोबत लोल्लापालूझा इंडियाच्या आफ्टरशोचे आमंत्रणही मिळेल. ही भारतातील ओरिजिनल संगीतांपैकी एक असलेल्या लय, भावना आणि सहकार्याची पडद्यामागील झलक असेल. हा अनुभव २४ जानेवारी २०२६ रोजी घेता येईल. त्यासाठी बुकिंग here येथे करता येईल. भारतातील लोकप्रिय साउंडट्रॅक आणि स्वतंत्र हिट्सच्या मागे असलेल्या ख्यातनाम संगीतकार-निर्माता जोडी ओएएफएफ आणि सवेरा यांना जवळून पाहता येईल. चित्रपट, पॉप आणि प्रायोगिक इलेक्ट्रॉनिक संगीत एकत्र आणणाऱ्या आवाजासह ते भारताच्या विकसित होत असलेल्या समकालीन संगीताचे प्रमुख शिल्पकार ठरले आहेत. या तल्लीन करणाऱ्या एअरबीएनबी अनुभवात चाहत्यांना या दोघांसोबत स्टेजच्या मागे घडणाऱ्या घटनांचे साक्षीदार होतील. त्यांना शोपूर्वी होणारी सर्जनशील प्रक्रिया अनुभवता येईल. भारतातील दोन ख्यातनाम कलाकार स्टुडिओपासून स्टेजपर्यंत संगीत कसे जिवंत करतात हे पाहण्याची ही एक दुर्मिळ संधी आहे. हा अनुभव २५ जानेवारी २०२६ रोजी घेता येईल. भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वात लोकप्रिय लाइव्ह म्युझिक इव्हेंटपैकी एक असलेला शो कशा रितीने घडतो हे जाणून घेण्यासाठी राशी संघवी, लोलापालूझा इंडिया इनसाइडरसोबत सहभागी होता येईल. फेस्टिव्हल प्रोडक्शन आणि जागतिक भागीदारीमागील प्रेरक शक्ती असलेली राशी लाइव्ह एंटरटेनमेंट, ब्रँड समन्वय आणि व्यापक प्रमाणात इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये वर्षानुवर्षांचा अनुभव घेऊन येत आहे. या अनुभवाच्या माध्यमातून राशी आतल्या गोष्टी, रिअल-टाइम माहिती आणि मजेदार अनुभवांची खाण चाहत्यांसमोर उलगडेल. तुम्ही संगीत प्रेमी असा किंवा मोठ्या प्रमाणात लाइव्ह इव्हेंट कसे एकत्र येतात हे जाणून घेण्याची उत्सुकता असेल तरी हा अनुभव संगीतामागील जादू पाहण्याची संधी देतो. हा अनुभव २४ जानेवारी २०२६ रोजी घेता येईल आणि येथे बुक करता येईल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### HDFC : सायबर फ्रॉड जागरुकतेसाठी कार्यशाळांचे आयोजन

मुंबई (आरंभ पर्व) : एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे त्यांच्या डिजिटल बँकिंग जागरुकता मोहिमचा एक भाग म्हणून संपूर्ण भारतात सायबर गुन्हेगारी विषयी जागरुकता कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. एप्रिल २०२५ पासून बँके तर्फे ४००० कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले असून या माध्यमातून २७००० नागरिकांना सुरक्षित डिजिटल बँकिंग विषयी शिक्षण देण्यात आले. या कार्यशाळांच्या माध्यमातून शाळा आणि कॉलेजातील विद्यार्थी, वरिष्ठ नागरीक, स्वयंसहायता गट, ग्राहक आणि कर्मचाऱ्याना शिक्षण देण्यात येते. या संभाषणात्मक अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून सहभागी लोकांना सुरक्षित डिजिटल बँकिंगच्या पध्दतींसह कशा प्रकारे सायबर गुन्ह्यांपासून वाचण्याच्या पध्दतीं विषयी माहिती देण्यात आली. या कार्यशाळांमध्ये खरी उदाहरणे, गोष्टी आणि व्हिडिओजच्या माध्यमातून सहभागी लोकांना गुन्हेगारांची कार्यपध्दती आणि त्यांच्यापासून बचाव करण्याच्या टिप्स सुध्दा देण्यात आल्या. यातील काही कार्यशाळांचे आयोजन हे लॉ एन्फोर्समेंट एजन्सीज (एलईएज)च्या सहकार्याने करण्यात आले होते.



### रेनबो इंटरनॅशनल स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : कदमवाकवस्ती येथे रेनबो इंटरनॅशनल स्कुलचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच संपन्न झाले.. मुलांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आणि त्यांच्या गुणांचं कौतुक करून पुढे जाण्याची प्रेरणा देण्याचा हा सोहळा.. या संपूर्ण सोहळ्यात शेकडो प्रेक्षकांपुढे आत्मविश्वासाने आपल्या कलाविष्काराचे सादरीकरण करणाऱ्या बालकलाकारांचे सर्वच उपस्थितांनी तोंडभरून कौतुक केले.. कलेच्या वेगवेगळ्या छटांचे सादरीकरण असणारे "सतरंगी" आणि शिवविचारांचा जागर करणारे "शिवचरित्र" या दोन्ही संकल्पना प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्याचे दिसून आले. सोहळ्याचे उदघाट्न रेनबो स्कुलचे चेअरमन श्री नितीन काळभोर, सेक्रेटरी सौ मंदाकिनी काळभोर, सीईओ श्री प्रथमेश काळभोर, लोणी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक उदय काळभोर, लोणी काळभोर गावचे सरपंच श्री नागेश काळभोर, मा. सरपंच श्री राहुल काळभोर, शिवशाहीर महेश खुळपे, रेनबो स्कुलच्या प्रिंसिपल सौ मिनल बंडगर, व्हाईस प्रिन्सिपल श्री प्रशांत लाव्हरे, रेनबो किड्स कायझेन स्कुलच्या प्रिन्सिपल सौ. ऐश्वर्या काळभोर यांच्या हस्ते पार पडले.. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सिनेअभिनेत्री सौ भाग्यश्री न्हालवे, सिनेअभिनेते श्री विनायक चौगुले यांची विशेष उपस्थिती होती.



### मुलाच्या हत्येप्रकरणी प्रकरणी राजगुरूनगर शहरात मेणबत्ती मोर्चा

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर शहरातील अल्पवयीन मुलाने अल्पवयीन मुलाची धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याच्या घटनेचा सर्व स्तरातून निषेध व्यक्त केला जात असून नागरिकांनी शहरात मेणबत्ती मोर्चा काढला. राजगुरुनगर येथे वास्तव्यास असलेला मृत पुष्कर दिलीप शिंगाडे या इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची खाजगी शिकवणी वर्ग सुरू असताना निघृण व अमानुषपणे हत्या झाल्याची घटना शहराला काळीमा फासणारी असून, शहरातील ढासळत चाललेल्या कायदा व सुव्यवस्थेचे विदारक वास्तव अधोरेखित करणारी आहे. पुष्कर शिंगाडे याला न्याय मिळालाच पाहिजे, ही राजगुरुनगरमधील प्रत्येक नागरिकाची भावना आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी प्रशासनाने केवळ आश्वासने न देता ठोस व कठोर पावले उचलणे गरजेचे असल्याचे मत यावेळी नागरीकांनी व्यक्त केले. पुष्कर शिंगाडे यांच्या हत्येतील आरोपीची क्रूरता, निर्दयता व गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता, त्याला अल्पवयीन म्हणून नव्हे तर प्रौढ आरोपी म्हणून वागणूक देण्यात यावी. या प्रकरणाची चौकशी निष्पक्ष, पारदर्शक व जलद गतीने करून आरोपीस फाशीची शिक्षा होण्यासाठी आवश्यक ती सर्व कायदेशीर कार्यवाही काटेकोरपणे करण्यात यावी. अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### जयश्री हॉटेलमध्ये अवैध वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश




लोणी काळभोर (आरंभ पर्व) : लोणी काळभोर पोलीस ठाणे हद्दीतील नामांकित हॉटेल जयश्री एक्झीक्युटिव्ह रेस्टॉरंट बार अॅन्ड लॉजिंग येथे छापा कारवाई दरम्यान वैश्या व्यवसाय करणारे ०२ आरोपीतांना ताब्यात घेऊन ०२ पिडीत महीलांची पोलीसांनी केली सुटका लोणी काळभोर परीसरात खळबळ.दि. १९डिसेंबर२०२५ रोजीदुपारचे. सुमारास पुणे सोलापुर रोडचे कडेला, हॉटेल जयश्री एक्झीक्युटिव्ह रेस्टॉरंट बार अॅन्ड लॉजिंग, कवडीपाट टोलनाका, लोणीकाळभोर, ता. हवेली, जिल्हा पुणे याठिकाणी वैश्या व्यवसाय चालु असल्याची गोपनिय खबऱ्यामार्फत माहीती प्राप्त झाल्याने, सदर माहीती खातरजमा करुन छापा कारवाईसाठी एक बनावट गि-हाईक तयार करुन पंचासह हॉटेल जयश्री एक्झीक्युटिव्ह रेस्टॉरंट बार अॅन्ड लॉजिग येथे पाठविण्यात आले.

संपादक-पत्रकारांसाठी
धमाका ऑफर
वायरलेस बूम माईक
फक्त ₹2999 मध्ये
मुख्य वैशिष्ट्ये:
वायरलेस बूम (माईक)
30 मीटरपर्यंत अगदी क्रिस्टल क्लिअर आवाज
एका चार्जिंगवर तब्बल १२ तास बॅकअप
लाइटवेट बूम स्टँड
प्रोफेशनल बूम डिझाईन
अँड्रॉइड, आयफोन आणि कॅमेरा सपोर्ट
माईक कव्हर + चार्जिंग वायर + बूम स्टिक
माईक व बूमवर तुमचे चॅनल लोगो/ब्रँड प्रिंट
चॅनल नाव व लोगोचे पूर्ण कस्टमाइजेशन
स्पेशल बूम बॅग मोफत
• ऑर्डर दिल्यावर ३ दिवसात बूम तयार
• शहराच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात घरपोच डिलिव्हरी
• हाय-स्पीड सर्व्हिस उपलब्ध
आता लगेच बुक करा – तुमचे रिपोर्टिंग होईल अजून प्रोफेशनल!
मुख्य कार्यालय
दै. आरंभ पर्व कार्यालय, फ्लॅट नं. १६, चौथा मजला, सोमेश्वर अपार्टमेंट ए, धायरी फाटा, सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, शिंदे/अदाते हॉस्पिटल लेन, त्रिमूर्ती हॉस्पिटल समोर, पुणे - ४११०४१
7276314142
8657865702

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५



OFFER... OFFER... OFFER
संपादक-पत्रकारांसाठी
धमाका ऑफर
युट्युब चॅनल साठी खास
शॉर्ट व्हिडिओ (रील्स) पॅकेज
शॉर्ट व्हिडिओ हे दै. आरंभपर्व कडून बनवले जातील
शॉर्ट व्हिडिओंमध्ये राजकीय बातम्या, व्हायरल व्हिडिओ असतील
कालावधी – फक्त १ ते ३ मिनिटे
चॅनल रिचनुसार ऑटोमॅटिक व्हायरल होणार
VIEWS आणि SUBSCRIBE वाढवण्यास मदत
शॉर्ट व्हिडिओंमधून पेमेंट कमाईची संधी
Shorts
फक्त : 8000 रुपये / महिना
(रोज ५ शॉर्ट व्हिडिओ - २६ दिवस)
मुख्य कार्यालय
दै. आरंभ पर्व कार्यालय, फ्लॅट नं. १६, चौथा मजला, सोमेश्वर अपार्टमेंट ए, धायरी फाटा, सिंहगड रोड, वडगाव बुद्रुक, शिंदे/अदाते हॉस्पिटल लेन, त्रिमूर्ती हॉस्पिटल समोर, पुणे - ४११०४१
7276314142
8657865702

# प्रभागातील जनतेचा विश्वास हीच खरी ताकद : राजेंद्रआबा शिळीमकर

## प्रभाग क्रमांक २० साठी भाजपकडून राजेंद्रआबा शिळीमकर यांची दावेदारी भक्कम






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 20 मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, माजी नगरसेवक राजेंद्रआबा शिळीमकर यांचे नाव पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले आहे. चार वेळा पुणे महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आलेले राजेंद्रआबा शिळीमकर हे भारतीय जनता पार्टीचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. सत्ता असो वा नसो, जनतेच्या प्रत्येक अडचणीत धावून जाणारे नेतृत्व अशी त्यांची प्रतिमा प्रभागात रुजलेली आहे.

दैनिक आरंभपर्व शी मिशन महानगरपालिका सदरामध्ये संवाद साधताना राजेंद्रआबा शिळीमकर यांनी आपल्या राजकीय प्रवासाविषयी मनमोकळेपणाने भावना व्यक्त केल्या.

"राजकारणात यश मिळते ते केवळ पदामुळे नाही, तर जनतेसाठी प्रामाणिकपणे केलेल्या कामामुळे," असे सांगताना त्यांच्या शब्दांत प्रभागाबद्दलची आपुलकी स्पष्टपणे जाणवत होती. सत्ता नसतानाही प्रभागातील नागरिकांच्या समस्या, प्रश्न आणि अडचणी यासाठी आपण कायम उपलब्ध राहिलो, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

प्रभाग क्रमांक 20 मध्ये त्यांनी केलेल्या विकासकामांचा आढावा घेताना अण्णाभाऊ साठे सभागृहाची उभारणी, विविध नागरी सुविधा, तसेच नागरिकांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आलेले दवाखाने यांचा उल्लेख त्यांनी केला. "ही कामे म्हणजे माझ्या राजकारणाची ओळख आहे. सर्वसामान्य माणसाच्या जीवनात थोडा तरी दिलासा मिळावा, हाच माझा उद्देश राहिला," असे भावनिक शब्दांत ते म्हणाले.

राजेंद्रआबा शिळीमकर हे केवळ राजकीयच नव्हे, तर सामाजिक व धार्मिक क्षेत्रातही सक्रिय आहेत. सद्गुरू शंकर महाराज ट्रस्ट अध्यक्ष म्हणून त्यांनी समाजात सलोखा आणि एकोप्याची भावना निर्माण करण्याचे काम केले आहे. त्यामुळेच 'राजेंद्रआबा' हे नाव प्रभागातील सर्वसामान्यांच्या मनात आदराने घेतले जाते.

गेल्या दहा वर्षांपासून भारतीय जनता पार्टी सत्तेत असून, या काळात पुणे शहराच्या विकासाला ठोस दिशा मिळाली असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. "रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रात भाजपने केलेले काम जनतेसमोर आहे. त्यामुळे पुण्यात पुन्हा भाजपची सत्ता येईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे, यावेळी प्रभागातील वातावरण वेगळेच चित्र दाखवत आहे. केवळ आबा पुन्हा महानगरपालिकेत जावेत एवढ्यावर नागरिकांचा आग्रह न राहता, राजेंद्रआबा शिळीमकर यांनी यावेळी थेट महापौरपदाची जबाबदारी घ्यावी, अशी अपेक्षा अनेक नागरिक व त्यांचे पाठीराखे उघडपणे व्यक्त करत आहेत. "प्रभागापुरते मर्यादित न राहता आबांनी संपूर्ण पुणे शहरासाठी काम करावे," अशी भावना या भागात प्रबळ होताना दिसत आहे.

याशिवाय असंख्य लाडक्या बहिणी आबांना राखी बांधण्यासाठी दरवर्षी जनसंपर्क कार्यालयामध्ये उपस्थित राहून त्यांना आशीर्वाद देतात.

मध्यंतरीच्या चार वर्षांच्या काळामध्ये ही त्यांनी जनसेवेला प्राधान्य दिले त्यामुळे त्यांच्या कार्याची सर्वत्र प्रचिती आहे.

> **"जनतेचा विश्वास हीच माझी खरी संपत्ती आहे. पाचव्यांदा पुणे महानगरपालिकेत जाण्याचा प्रयत्न करतो आहे. कोणतीही जबाबदारी मिळो, प्रभाग 20 आणि पुणे शहराचा सर्वांगीण विकास हाच माझा ध्यास राहील," असे भावनिक शब्दांत राजेंद्रआबा शिळीमकर यांनी संवादाचा समारोप केला.**

# किरण इंगळे यांचा विजय

**धाराशिव (दै. आरंभ पर्व)**

धाराशिव नगरपरिषदेच्या अत्यंत चुरशीच्या आणि लक्षवेधी ठरलेल्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ८ (अनुसूचित जाती महिला प्रवर्ग) मधून भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार किरण ईश्वर इंगळे (शिरसाटे )यांनी 104 विजय मिळवला आहे. त्यांनी आपल्या प्रतिस्पर्धी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या मानसी शिंगाडे यांचा पराभव करत मतदारांचा विश्वास संपादन केला. या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ८ मध्ये मोठ्या प्रमाणावर मतदान झाले होते. मतमोजणीनंतर किरण इंगळे (शिरसाटे)यांच्या



विजयाची घोषणा होताच कार्यकर्ते आणि समर्थकांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला. फटाके फोडून व एकमेकांना शुभेच्छा देत विजय साजरा करण्यात आला.किरण ईश्वर इंगळे (शिरसाटे) भारतीय जनता पार्टीचे आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व संघटनात्मक कार्यात सक्रिय आहेत.

# जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती गाईडचे वाटप

**मालखेड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मालखेड येथील इयत्ता चौथीमधील सर्व १२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी नवनीत गाईड संच आज मंगळवार दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी वाटप करण्यात आले. हे वाटप विद्यमान सरपंच ग्रामपंचायत मालखेड मा. श्रीमती नंदाताई लालदास जोरी यांच्या वतीने करण्यात आले.




यावेळी सरपंच नंदाताई जोरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश संपादन करावे, यासाठी आवश्यक सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. तसेच शाळेला आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण होऊन शिष्यवृत्ती परीक्षेसाठी त्यांचा आत्मविश्वास वाढणार असल्याचे मत मुख्याध्यापक व शिक्षकांनी व्यक्त केले. या उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती मालखेड, मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षकांच्या वतीने सरपंच नंदाताई जोरी यांचे आभार मानण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी ग्रामपंचायतीच्या वतीने राबविण्यात येणारा हा उपक्रम पालक व ग्रामस्थांमध्येही कौतुकाचा विषय ठरत आहे.

# भूपेंद्र मोरे यांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३४ मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रबळ उमेदवार श्री. भूपेंद्र मुरलीधर मोरे यांच्या सामाजिक व सार्वजनिक कार्याचा आढावा घेणारी २०२६ सालची दिनदर्शिका राज्याचे उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली.

या प्रसंगी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा मा. रूपाली चाकणकर, आमदार चेतन तुपे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुनील टिंगरे, सुभाष जगताप, दीपकभाऊ मानकर यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दिनदर्शिकेमध्ये भूपेंद्र मोरे यांनी आजपर्यंत प्रभाग क्रमांक ३४ मध्ये केलेल्या सामाजिक, नागरी आणि लोकहिताच्या कामांचा आढावा मांडण्यात आला आहे. या दिनदर्शिकेचे अवलोकन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोरे यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले.

भूपेंद्र मोरे हे गेल्या अनेक वर्षांपासून प्रभागातील नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी सक्रियपणे कार्यरत असून, मूलभूत सुविधा, नागरी समस्या, तसेच सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीत भूपेंद्र मोरे हे प्रभाग क्रमांक ३४ मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवणार आहेत . दिनदर्शिका प्रकाशनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा लेखाजोखा नागरिकांसमोर मांडण्यात आला.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
१.समाजसेवेची आवड
२.जनसंपर्क
३.स्मार्ट फोन असणे आवश्यक
४.सोशल मीडियाचा वापर करता येणे
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# प्रभाग क्रमांक २७ मध्ये बागुल यांच्या युवा नेतृत्वाबाबत उत्सुकता

## आबा बागुल यांच्या कर्तृत्वाचा वारसा पुढे नेण्यासाठी शिवसेनेकडून हेमंत बागुल रिंगणात






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 27 मध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून, माजी उपमहापौर आबा बागुल यांचे चिरंजीव हेमंत बागुल हे सक्रियपणे रिंगणात उतरत असल्याची चर्चा सध्या प्रभागात केंद्रस्थानी आहे. बागुल परिवाराने गेल्या अनेक वर्षांत सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात निर्माण केलेली विश्वासार्ह ओळख पुढे नेण्यासाठी हेमंत बागुल सज्ज झाल्याने, स्थानिक राजकारणात नव्या युवा नेतृत्वाची चर्चा सुरू झाली आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नेतृत्वातील शिवसेनेमध्ये आबा बागुल व त्यांच्या सर्व परिवाराने व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळे हेमंत बागुल हे शिवसेनेकडून रिंगणात उतरणार आहेत हे जवळपास नक्की झाले आहे.

आबा बागुल यांनी प्रभागातील नागरिकांसाठी सातत्याने केलेले सामाजिक कार्य, जनसंपर्क आणि विकासासाठीची धडपड आजही नागरिकांच्या स्मरणात आहे. त्या कर्तृत्वाचा वारसा पुढे नेताना, हेमंत बागुल आधुनिक शिक्षण आणि नव्या विचारसरणीच्या आधारे विकासाचे नवे मॉडेल उभे करण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे.

हेमंत बागुल हे आर्किटेक्चर क्षेत्रातील उच्चशिक्षित व्यावसायिक असल्यामुळे, विकासाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा केवळ राजकीय नव्हे तर तांत्रिक आणि नियोजनबद्ध असल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

प्रभागातील रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक मोकळ्या जागा, उद्याने तसेच नागरी सुविधांचा समतोल विकास करण्यासाठी ठोस आराखडा आणि स्पष्ट रणनीती आखण्यावर त्यांचा भर असल्याची चर्चा आहे. "विकास हा तात्पुरत्या उपायांपुरता मर्यादित न ठेवता दीर्घकालीन आणि शाश्वत असावा," अशी त्यांची भूमिका असल्याचे सांगितले जाते.

उच्च शिक्षण, तरुणांशी असलेला थेट संवाद आणि समकालीन विषयांवरील समज यामुळे हेमंत बागुल यांना प्रभागातील युवकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. रोजगार, कौशल्य विकास, क्रीडा सुविधा, शिक्षण आणि उद्योजकतेसाठी संधी निर्माण करणे या मुद्द्यांवर त्यांची भूमिका स्पष्ट असल्यामुळे युवकांमध्ये त्यांच्या नेतृत्वाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. त्याचबरोबर महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य घटकांच्या दैनंदिन समस्यांकडेही ते संवेदनशीलपणे पाहतात, असे स्थानिक नागरिक सांगतात.

दैनिक आरंभपर्व – मिशन महानगरपालिका या विशेष सदरामध्ये हेमंत बागुल यांच्याशी संवाद साधण्यात आला. यावेळी त्यांनी सांगितले की, "एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली प्रभागाच्या विकासासाठी प्रयत्न करू. नागरिकांचा विश्वास आणि सहभाग याच्या बळावरच प्रभागाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. पारदर्शकता, नियोजन आणि सातत्य हेच माझ्या कामाचे प्रमुख सूत्र असेल. "

एकूणच, आबा बागुल यांच्या कर्तृत्वाचा वारसा पुढे नेण्यासाठी हेमंत बागुल रिंगणात उतरल्याने प्रभाग क्रमांक २० मधील जनतेमध्ये उत्सुकता आणि अपेक्षा वाढल्या आहेत. आगामी काळात प्रभागातील जनता त्यांना कोणत्या प्रकारे साथ देते आणि हे युवा नेतृत्व कितपत विश्वासार्ह ठरते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

## थोडक्यात पण महत्वाचे



### राष्ट्रीय सेवा योजना – विशेष हिवाळी शिबीर संपन्न

**खानापूर (आरंभ पर्व) :** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या नर्सिंग कॉलेज, धनकवडी (पुणे) येथील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विशेष हिवाळी शिबिराचे आयोजन दि. १४ ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत मु. पो. खानापूर, ता. हवेली, जि. पुणे येथे करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. अविनाश म्हेत्रे, प्राचार्या डॉ. भाग्यश्री जोगदेव, उपप्राचार्य डॉ. प्रवीण दाणी, खानापूर गावच्या सरपंच सौ. शिल्पा सुधाकर गायकवाड तसेच ग्रामपंचायत सदस्य श्री. सुधाकर गायकवाड यांच्या हस्ते झाले. शिबिरादरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विविध सामाजिक उपक्रम राबविले. यामध्ये ग्रामस्वच्छता, शालेय मुलांची आरोग्य तपासणी, आयुष्मान भारत कार्ड तयार करून देणे, महिलांचे हिमोग्लोबिन (लोहाचे प्रमाण) तपासणे, वृक्षारोपण, आरोग्याचा आढावा घेणे तसेच आरोग्यविषयक जनजागृती कार्यक्रमांचा समावेश होता. या शिबिरामुळे स्वयंसेवकांमध्ये व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळाली असून राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होण्यास मदत झाली. शिबिराची सांगता निरोप समारंभाने करण्यात आली. या विशेष हिवाळी शिबिराचे यशस्वी आयोजन कार्यक्रम अधिकारी सौ. सोनाली अत्रे व श्री. दीपक खेमनर यांनी केले.

### रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला पाठींबा

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार व रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल डंबाळे व प्रतिनिधी यांची आज सकाळी बारामती गेस्ट हाऊस येथे बैठक पार पडली होती. या वेळी अजित पवार यांनी अल्पसंख्याक, दलित व आंबेडकरी समुदायाच्या प्रश्नांवर केलेल्या कामाच्या अनुषंगाने त्यांचे आभार व्यक्त करत हा पाठिंबा देत असल्याचे डंबाळे यांनी सांगितले. पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील आगामी योजनांच्या अंमलबजावणीत अनेक समाजोपयोगी विषय मार्गी लावण्याचे आश्वासन अजित पवार यांनी दिल्याने त्याबाबत समाधान व्यक्त करण्यात येत असल्याचे डंबाळे यांनी यावेळी सांगितले.



## थोडक्यात पण महत्वाचे




### 'बायोलॉजिकल ब्लूप्रिंट' तंत्रज्ञान लाँच

पुणे (आरंभ पर्व) : धावपळीची जीवनशैली, कामाचा प्रचंड ताण आणि चुकीच्या आहारपद्धतीमुळे आजचा तरुण आणि मध्यमवयीन वर्ग विविध व्याधींच्या विळख्यात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर, आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी आणि 'रिस्टोरेटिव्ह हेल्थकेअर' (पुनरुज्जीवन आरोग्य सेवा) क्षेत्रात क्रांती घडवण्यासाठी 'टूपिक™ हेल्थ' सज्ज झाले आहे. आज पुण्यात एफसी रोड येथे या केंद्राचे भव्य उद्घाटन करण्यात आले. भारतात पहिल्यांदाच 'बायोलॉजिकल ब्लूप्रिंट' बदलणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान याद्वारे सादर करण्यात आले आहे. सोशल मीडियावरील अपुऱ्या माहितीच्या आधारे दिले जाणारे सल्ले आणि 'फॅड डाएट्स' (Fads) यांना छेद देण्यासाठी नामांकित डॉक्टरांनी एकत्र येऊन टूपिक हेल्थची स्थापना केली आहे. डॉ. संजीव शशीधरन, डॉ. गौरव मिश्रा, डॉ. विक्रमादित्य साळवी, डॉ. अमित चक्रवर्ती आणि वरुण त्रिपाठी या तज्ज्ञांच्या नेतृत्वाखाली हे केंद्र कार्यरत असेल. २० अनुभवी डॉक्टरांचा यात गुंतवणूकदार म्हणून सहभाग आहे.




### सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात समन्वय बैठक संपन्न

पुणे-लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर नामनिर्देशन पत्र भरणे/दाखल करणे, निवडणूक आचारसंहिता तसेच इतर अनुषंगिक बाबींबाबत मार्गदर्शन करण्यासाठी राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवारांसोबत समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ही बैठक सोमवार, दिनांक २२ डिसेंबर २०२५ रोजी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय येथे पार पडली. सदर बैठकीचे आयोजन मा. श्री. मनोजकुमार खैरनार, निवडणूक निर्णय अधिकारी (प्रभाग क्रमांक ३३, ३४ व ३५) यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. बैठकीस विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच इच्छुक उमेदवार मिळून सुमारे २०० जण उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी श्री. मनोजकुमार खैरनार यांनी नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, मुदती, निवडणूक आचारसंहितेतील महत्त्वाचे मुद्दे तसेच निवडणूक काळात घ्यावयाची दक्षता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच बैठकीदरम्यान राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व इच्छुक उमेदवारांनी उपस्थित केलेल्या विविध शंका व प्रश्नांचे समाधानकारक निरसन करण्यात आले. त्यामुळे उपस्थितांना नामनिर्देशन प्रक्रिया व आचारसंहितेबाबत स्पष्टता मिळाली.







# समस्त गाव असलेल्या प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध

## सौ. मनीषा भगवान मोरे : भारतीय जनता पार्टी कडून प्रभाग ३३ साठी सौ. मनीषा भगवान मोरे इच्छुक




- भारतीय जनता पार्टीला विजय मिळवण्यासाठी प्रयत्न करणार; मोरे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 33 (खडकवासला–शिवणे–धायरी पार्ट) हा प्रभाग सध्या शहरातील राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. या प्रभागाच्या विकासासंदर्भात खडकवासला भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा मनीषाताई भगवान मोरे यांच्याशी दैनिक आरंभपर्वने संवाद साधला. या संवादातून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाबरोबरच प्रभागाच्या सर्वांगीण विकासाची स्पष्ट दिशा मांडली.

मनीषा मोरे या न्यू कोपरे गावच्या माजी उपसरपंच असून, त्या काळात त्यांनी प्रशासनातील अनुभव घेत स्थानिक नागरिकांच्या समस्या जवळून पाहिल्या. पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते, स्वच्छता, वाहतूक कोंडी, कचरा व्यवस्थापन, तसेच आरोग्य व शिक्षण सुविधा या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले. "समस्या फक्त ऐकून घेणे नव्हे, तर त्यावर उपाय शोधणे हेच खरे लोकप्रतिनिधीचे काम असते," असे त्या ठामपणे सांगतात.

खडकवासला–शिवणे–धायरी या भागात झपाट्याने शहरीकरण होत आहे. वाढती लोकसंख्या आणि बदलत्या गरजांमुळे नियोजनबद्ध विकासाची नितांत गरज असल्याचे त्या नमूद करतात. दीर्घकालीन पाणीपुरवठा योजना, सुरक्षित व सुस्थित रस्ते, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुविधा, तसेच युवकांसाठी रोजगाराभिमुख उपक्रम यावर भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.



भारतीय जनता पार्टीच्या सर्व संघटनात्मक, सामाजिक व विकासात्मक उपक्रमांमध्ये मनीषा मोरे यांनी भरीव योगदान दिले आहे. पक्षाने राबवलेल्या आंदोलनांपासून ते जनसंपर्क अभियानांपर्यंत प्रत्येक टप्प्यावर त्या सक्रिय राहिल्या आहेत. अनुकूल परिस्थिती असो किंवा संघर्षमय काळ, दोन्ही वेळेस त्यांनी पक्षासाठी निष्ठेने कार्य केले. अडचणींच्या काळातही मागे न हटता कार्यकर्त्यांना सोबत घेत पक्षाची भूमिका जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी प्रामाणिकपणे केले आहे. यामुळेच त्या आज विश्वासार्ह व कार्यक्षम नेतृत्व म्हणून ओळखल्या जात आहेत.

महिला मोर्चाच्या अध्यक्षा म्हणून महिलांचे प्रश्न, त्यांचे सक्षमीकरण, बचत गट, स्वयंरोजगार, तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे.

संवादादरम्यान त्यांनी भारतीय जनता पार्टीने पुणे शहराच्या विकासासाठी राबवलेल्या योजनांचा उल्लेख करत सांगितले की, "भाजपच्या विकासाभिमुख धोरणांमुळेच शहराला नवी दिशा मिळाली आहे. त्याच विचारांवर काम करत प्रभाग क्रमांक 33 चा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध आहे."

"प्रभाग क्रमांक 33 हा माझ्यासाठी केवळ भौगोलिक भाग नाही, तर माझ्या सामाजिक कार्याची ओळख आहे. नागरिकांचा विश्वास हीच माझी खरी ताकद आहे. या प्रभागाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करून भारतीय जनता पार्टीला येथे मोठे यश मिळवून देण्याचा मला पूर्ण आत्मविश्वास आहे," असे सांगत मनीषा मोरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

एकूणच, खडकवासला–शिवणे–धायरी पार्ट या प्रभागात विकासकेंद्री दृष्टी, अनुभव आणि पक्षनिष्ठा यांचा संगम असलेले नेतृत्व म्हणून मनीषा मोरे यांच्याकडे पाहिले जात असून, आगामी काळात त्यांची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# उत्खननाची परवानगी एका गावची, काम दुसऱ्या गावात!

- वेल्हे तहसिलदार–नायब तहसिलदारांच्या भूमिकेवर संशय
- जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली
- गोडेखल, कुर्तवडी, बालवडी, शिरकोली, आबेगाव गावांचा समावेश

**राजगड – वेल्हे (दै. आरंभ पर्व)**

वेल्हे तालुका हा पश्चिम घाटातील इको-सेन्सिटिव्ह झोन (ESZ) मध्ये मोडतो. पानशेत धरणाच्या वरच्या भागातील अतिसंवेदनशील परिसरात बेकायदेशीर उत्खनन सुरू असल्याचे गंभीर प्रकार उघडकीस आले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, उत्खननाची परवानगी एका गावच्या नावावर घेऊन प्रत्यक्षात काम दुसऱ्याच गावात सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. पुणे जिल्ह्यातील एकूण ३३९ गावे इको-सेन्सिटिव्ह झोनमध्ये येतात. त्यापैकी वेल्हे तालुक्यातील सुमारे ५८ गावांचा समावेश आहे. कोडेखल, कर्तवडी, बालवडी, शिरकोली व आबेगाव या गावांच्या परिसरात हे उत्खनन सुरू असल्याची चर्चा आहे. अशा संवेदनशील भागात उत्खननावर कडक निर्बंध असतानाही महसूल यंत्रणा डोळेझाक करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. उत्खननास परवानगी देताना प्रत्यक्ष ठिकाण, करवाने (रॉयल्टी) आणि कामाचे क्षेत्र तपासले गेले का, याबाबत कोणतीही स्पष्टता नाही. "तलाठी झोपेचे सोंग घेत आहेत," अशी उघड चर्चा परिसरात सुरू असून, तलाठी, सर्कल अधिकारी, नायब तहसिलदार व तहसिलदार यांच्या भूमिकेवर संशयाची सुई रोखली जात आहे. वेल्हे तालुका हा दरडप्रवण भाग म्हणून ओळखला जातो. अशा ठिकाणी सुरू असलेल्या उत्खननामुळे भविष्यात माळीणसारखी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

# अमोल बालवडकर : स्नेह मेळावा उत्साहात साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नूतन वर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर अमोल बालवडकर मित्र परिवाराच्या वतीने हायस्ट्रीट मैदान, बालेवाडी येथे आयोजित करण्यात आलेला स्नेह मेळावा अत्यंत उत्साहपूर्ण आणि आपुलकीच्या वातावरणात संपन्न झाला.




बाणेर-बालेवाडी-सुस-म्हाळुंगे-पाषाण-सुतारवाडी-सोमेश्वरवाडी भागातील हजारो नागरिकांनी आपल्या कुटुंबीयांसह उपस्थित राहून या स्नेह मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमाची शोभा वाढवली. हास्य, संवाद आणि जिव्हाळ्याच्या नात्यांची उब अनुभवत सर्वांनी आनंदाचे क्षण सामायिक केले.

या स्नेहमेळाव्यामध्ये सर्वांच्या उपस्थितीत अमोल बालवडकर यांच्या दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी प्रभागातील विकासकामे, नागरिकांसाठी राबविण्यात आलेले विविध उपक्रम आणि पुढील वाटचालीचा संकल्प यावर मनमोकळा संवाद झाला. नागरिकांकडून मिळालेला प्रेमळ प्रतिसाद, विश्वास आणि पाठबळ हेच पुढील काळात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देणारे ठरले.

शिवाय आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने देखील आमचा पाठिंबा आपल्यासोबत राहील हा विश्वास नागरिकांच्या बोलण्यातून स्पष्ट दिसत होता, या गोष्टीचे विशेष समाधान वाटले. कारण यातूनच खऱ्या अर्थाने केलेली विकासकामे आणि राबविलेले उपक्रम नागरिकांपर्यंत पोहोचल्याची एकप्रकारे खात्री मिळते.

आपुलकी, एकजूट आणि सकारात्मक ऊर्जेने ओतप्रोत भरलेला हा स्नेह मेळावा सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला. मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविल्याबद्दल सर्व नागरिकांचे मनःपूर्वक आभार..!

यावेळी व्यासपिठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विद्यापिठ भाग कार्यवाहक संजयजी वाघुळदे, माजी महापौर दत्ता गायकवाड, माजी नगरसेवक ज्ञानेश्वरभाऊ तापकीर, माजी नगरसेविका रोहिणीताई चिमटे, स्वप्नाली सायकर, ज्योती कळमकर, भाजपा ज्येष्ठ नेते प्रकाशतात्या बालवडकर, कोथरुड उत्तर मंडलाचे अध्यक्ष लहुशेठ बालवडकर, गणेशजी कळमकर, प्रल्हादजी सायकर, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते प्रकाशतात्या किसन बालवडकर, भाजपा नेते सुहासजी भोते, मा.प्रियंकाताई चिव्हे, माजी सरपंच नामदेवराव गोलांडे, काळुरामजी गायकवाड, युवा नेते अनिलबाप्पु ससार, अॅड शिवाजीराव जांभुळकर, हिंजवडी विद्यमान सरपंच गणेशजी जांभुळकर, उपस्थित होते.

तसेच स्नेहमेळावा प्रसंगी भाजपा कोथरूड उत्तर मंडलाचे सर्व महिला पदाधिकारी, सर्व आघाडीचे सदस्य, कार्यकर्ते, सदस्य, ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरीक, परिसरातील सोसायटीचे पदाधिकारी व अमोल बालवडकर फाऊंडेशनचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# बदल हवा तर चेहरा नवा!

## जनतेसाठी झटणारे निर्भीड पत्रकार विठ्ठल तांबे थेट निवडणूक रिंगणात




- मिशन महानगरपालिका | प्रभाग क्रमांक ३४ | नऱ्हे–वडगाव बु., धायरी, पुणे (स्मार्ट प्रभाग संकल्पना)



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकारण तापू लागले असताना, प्रभाग क्रमांक ३४ मधून एक वेगळाच, पण जनतेच्या मनाला भिडणारा आवाज पुढे येत आहे. वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या प्रश्नांना वाचा फोडणारे, सत्तेच्या चौकटीबाहेर उभे राहून व्यवस्थेवर बोट ठेवणारे निर्भीड पत्रकार विठ्ठल तांबे यांनी थेट निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्धार जाहीर केला आहे. ही केवळ उमेदवारी नाही, तर प्रस्थापित राजकारणाविरोधातील एक थेट आव्हान मानली जात आहे.

**लेखणीपासून थेट निवडणूक लढ्यापर्यंतचा प्रवास**

दैनिक आरंभपर्वशी बोलताना विठ्ठल तांबे यांनी आपली भूमिका अत्यंत स्पष्ट शब्दांत मांडली.

ते म्हणाले, "मी सत्तेसाठी नाही, तर सत्यासाठी लढणारा पत्रकार आहे. अनेक वर्षे लेखणी, फाईल, कॅमेरा आणि मायक्रोफोन घेऊन लोकांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरलो. प्रशासनाच्या दारात, पोलिस ठाण्यांत, महापालिकेच्या कार्यालयांत सामान्य माणसाचा आवाज पोहोचवण्याचं काम केलं. आता हीच लढाई थेट निवडणुकीतून लढायची वेळ आली आहे."

पत्रकार म्हणून काम करत असताना त्यांनी कधीही एसी केबिनमध्ये बसून प्रश्न मांडले नाहीत. रस्त्यावर उतरून, धूळ–ऊन–पावसात फिरत त्यांनी नागरिकांच्या समस्या थेट अनुभवल्या. हाच अनुभव आता त्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून वापरण्याचा निर्णय घेतला आहे.

**१८ तास दुचाकीवर – ही जाहिरात नाही, ही वास्तव परिस्थिती**

विठ्ठल तांबे यांची ओळख केवळ पत्रकार म्हणून नाही, तर "रस्त्यावरचा माणूस" म्हणून आहे. दररोज १६ ते १८ तास दुचाकीवरून संपूर्ण प्रभागात फिरत, नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेणे, संबंधित कार्यालयांत पाठपुरावा करणे, अन्यायाविरोधात आवाज उठवणे - ही त्यांची दिनचर्या आहे.

ते ठामपणे सांगतात, "मी एसी ऑफिसमध्ये बसून राजकारण करत नाही. उन्हात, पावसात, रात्री-अपरात्री दुचाकीवरून लोकांच्या सेवेसाठी फिरणं हेच माझं राजकारण आहे." याच भूमिकेमुळे प्रभागातील तरुण, मध्यमवर्ग, कामगार, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास निर्माण झाला आहे.

**प्रस्थापित राजकारणावर थेट प्रहार**

प्रभाग क्रमांक ३४ मधील परिस्थितीवर भाष्य करताना तांबे यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, "प्रभागातील जनता अडचणीत असताना सत्ताधारी खुर्चीवर बसून होते. आश्वासनं दिली गेली, पण रस्ते तसेच राहिले. पाणी येईना, स्वच्छता ढासळली, वाहतूक कोंडी वाढली. त्यामुळे आता केवळ ओळखीची नाही, तर प्रत्यक्ष काम करणाऱ्या चेहऱ्याची गरज आहे." ही टीका केवळ राजकीय आरोप नसून, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित वास्तव असल्याचे नागरिकही मान्य करत आहेत.

**प्रभाग ३४ : समस्यांचा विळखा**

नऱ्हे–वडगाव बु., धायरी परिसरातील नागरिक आजही अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. वाहतूक कोंडी, अरुंद आणि खराब रस्ते, अनियमित पाणीपुरवठा, सार्वजनिक शौचालयांचा अभाव, स्वच्छतेची गंभीर समस्या, उद्यानांचा अभाव - या प्रश्नांनी प्रभाग हैराण झाला आहे.

यावर तांबे स्पष्टपणे म्हणतात, "नगरसेवक झाल्यानंतर केवळ उद्घाटनापुरते राजकारण न करता, प्रत्येक समस्येच्या मुळाशी जाऊन कायमस्वरूपी उपाय करणार."

**भ्रष्टाचाराविरोधात शून्य सहनशीलता**

भ्रष्टाचाराबाबत कोणतीही तडजोड नसेल, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे. ते म्हणाले, "जनतेच्या पैशावर डल्ला मारणाऱ्यांसाठी हा प्रभाग नाही. एक रुपयाही गैरमार्गाने घेतला जाणार नाही. प्रत्येक निधीचा हिशेब जनतेसमोर मांडला जाईल." ही भूमिका आजच्या राजकीय वातावरणात वेगळी आणि धाडसी मानली जात आहे.

**जनतेतून उमटणारा सूर : 'बदल हवा तर चेहरा नवा!'**

प्रभागातील सुज्ञ मतदार आता केवळ पक्ष, झेंडा किंवा घोषणा पाहत नाहीत, तर काम, प्रामाणिकपणा आणि उपलब्धता पाहत आहेत.

त्यामुळेच "बदल हवा तर चेहरा नवा हवा" ही भावना अधिक ठळकपणे समोर येताना दिसत आहे.

### कोण आहेत विठ्ठल तांबे?

- व्यवसायाने पत्रकार
- जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने रस्त्यावर
- दररोज १६–१८ तास दुचाकीवरून प्रभागात जनसेवा
- कोणत्याही प्रस्थापित राजकीय गटाशी बांधिलकी नाही
- थेट, स्पष्ट आणि निर्भीड भूमिका

### प्रभाग क्रमांक ३४ चे जळजळीत प्रश्न

- वाहतूक कोंडी आणि अरुंद रस्ते
- खराब व अपूर्ण रस्ते
- अनियमित व अपुरा पाणीपुरवठा
- सार्वजनिक शौचालयांचा अभाव
- स्वच्छतेचा गंभीर प्रश्न, उद्यानांचा अभाव
- मूलभूत नागरी सुविधांची कमतरता
- गुन्हेगारीमुक्त प्रभागाची गरज

### विठ्ठल तांबेंची ठाम भूमिका

- भ्रष्टाचारमुक्त कारभार
- निधीचा पारदर्शक वापर
- प्रश्नांवर तात्पुरते नव्हे, शाश्वत उपाय
- लोकांच्या दारात जाऊन काम

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सचिन दोडके अखेर भाजपमध्ये

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक व खडकवासला विधानसभा मतदारसंघातील मातब्बर नेते,सचिन दोडके यांनी आज भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. त्यांच्या या प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) ला मोठा राजकीय धक्का बसला आहे. मागील काही दिवसांपासून सचिन दोडके यांच्या भाजप प्रवेशाबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू होत्या. अखेर आज त्यांच्या अधिकृत प्रवेशाने या सर्व चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. सचिन दोडके हे पुणे महानगरपालिकेमध्ये सलग दोन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आले असून त्यांनी आपल्या कार्यकाळात नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने काम केले आहे. तसेच त्यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) कडून दोन वेळा विधानसभा निवडणूक लढवली आहे. भाजप प्रवेशाच्या वेळी बोलताना केंद्रीय मंत्री मा. मुरलीधर मोहोळ यांनी सचिन दोडके यांच्या कार्यक्षम व कार्यतत्पर नेतृत्वाचे कौतुक केले. "असे जमिनीवर काम करणारे नेतृत्व भाजपमध्ये सामील होत असल्याने पक्षाला निश्चितच आगामी काळात मोठा फायदा होईल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष मा. रवींद्र चव्हाण यांनी सचिन दोडके यांचे भारतीय जनता पार्टीत औपचारिक स्वागत केले. या कार्यक्रमास भाजपचे राज्य व शहर पातळीवरील पदाधिकारी, स्थानिक नेते तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी सचिन दोडके यांचे पक्षात उत्स्फूर्त स्वागत केले. सचिन दोडके यांच्या प्रवेशामुळे पुणे शहर आणि खडकवासला विधानसभा मतदारसंघात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



### उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत आबा बागुल यांचा शिवसेनेत प्रवेश

पुणे (आरंभ पर्व) : आज राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर तसेच माजी स्थायी समिती सभापती आबा बागुल यांनी आपल्या असंख्य सहकाऱ्यांसह शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. आबा बागुल यांनी आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत लोकाभिमुख भूमिका कायम ठेवली आहे. पुणे शहराच्या विकासासाठी, नागरी सुविधा, पायाभूत प्रश्न तसेच सामाजिक विषयांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. हीच जनतेशी जोडलेली भूमिका ते यापुढेही शिवसेनेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे पुढे नेतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या पक्षप्रवेश प्रसंगी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष अमित बागुल, काँग्रेस युवा शहर चिटणीस कपिल बागुल, पुणे शहर काँग्रेसचे सचिव अभिषेक बागुल, माजी सरचिटणीस हेमंत बागुल यांच्यासह दीपक गावडे, घनश्याम सावंत, विलास रत्नपारखी, जयवंत जगताप तसेच अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश कोंडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आबा बागुल यांच्या प्रवेशामुळे पुणे शहरातील शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढेल, तसेच आगामी काळात पक्षाला नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ खडसे यांनी व्यक्त केला.

### पुण्यात महायुतीची ताकद वाढली; पदाधिकारी भाजप अन् शिंदे गटात

पुणे (आरंभ पर्व) : पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील काही भाजप प्रवेश शनिवारी आज मुंबईत झाले आहेत. त्यात अनेक दिग्गज माजी नगरसेवकांचा समावेश आहे. पुणे महापालिकेची निवडणूक जाहीर झाल्यामुळे सर्वच पक्षातील इच्छुकांनी उमेदवारीच्या तिकिटासाठी फिल्डिंग सुरू केली आहे. भाजपकडे इच्छुकांची संख्या अन्य पक्षांच्या तुलनेत खूपच जास्त आहे. त्यात ज्या भागात भाजपची ताकद कमी आहे. त्या भागात अन्य पक्षातून मोठ्या प्रमाणात भाजपमध्ये इनकमिंग झाली आहे. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष , काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटातील काही माजी नगरसेवकांचा यामध्ये समावेश आहे. विधानसभेत काँग्रेससोबत बंडखोरी करणारे आबा बागुल यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार बापू पठारे यांचे पुत्र सुरेंद्र पठारे, विकास नाना दांगट, सायली वांजळे, रोहिणी चिमटे, नारायण गलांडे, सचिन दोडके यांनीसुद्धा भाजपमध्ये प्रवेश केला आहे. पुण्यातील बऱ्याच माजी नगरसेवकांनी महायुतीमध्ये प्रवेश केल्याचे सध्यातरी दिसत आहे. त्यामुळे पुढील महिन्यात होणाऱ्या महापालिका निवडणुकीत महायुतीची ताकद वाढल्याचे दिसू लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुणे, पिंपरी दोन्ही महापालिकांमध्ये एकहाती भाजपची सत्ता येणार असल्याचे सांगितले आहे. अशातच महाविकास आघाडी आणि अजित पवार गटातील बरेच पदाधिकारी भाजपमध्ये प्रवेश करताना दिसत आहेत. तर काही जणांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. आबा बागुल यांनी विधानसभेत काँग्रेससोबत बंडखोरी करून अपक्ष निवडणूक लढवली होती. त्यामुळे महाविकास आघाडीचा उमेदवार त्याठिकाणी पराभूत झाला. आता त्यांनी शिंदे गटात प्रवेश करून महायुतीची ताकद वाढवली आहे. तर सुरेंद्र पठारे, विकास नाना दांगट, सायली वांजळे, रोहिणी चिमटे, नारायण गलांडे, सचिन दोडके हे शरद पवार गटाचे पदाधिकारी होते. त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करून महायुतीची ताकद वाढवली आहे. त्यामुळे पुण्यातील पर्वती, सिंहगड रोड, खडकवासला, धायरी, वडगाव शेरी भागात आता महायुतीचे सार्वधिक उमेदवार आहेत.

# धायरी नव्हे वडगाव प्रभागाच्या विकासासाठी कटिबद्ध

## सौ. अनिता चंद्रकांत पोकळे : नवा विचार घेऊन राजकारण करणार; सौ. अनिता पोकळे






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३४ मधून सामाजिक कार्याच्या जोरावर पुढे आलेल्या सौ. अनिता चंद्रकांत पोकळे या जनसेविकेची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे.

नव विचार घेऊन राजकारण करण्याचा संकल्प केलेल्या. सामाजिक कार्यकर्त्या सौ.अनिता पोकळे यांच्याशी आरंभपर्व "मिशन महानगरपालिका" सदरामध्ये संवाद साधला. गेल्या अनेक वर्षांपासून धायरी परिसरात सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय सहभाग घेत त्यांनी एक संवेदनशील, शांत आणि लोकाभिमुख कार्यकर्ती अशी ओळख निर्माण केली आहे.

सौ. अनिता पोकळे या सामाजिक जाणिवेतून काम करणाऱ्या असून, सामान्य नागरिकांच्या दैनंदिन अडचणी, महिलांचे प्रश्न, युवकांचे रोजगाराशी संबंधित प्रश्न तसेच पायाभूत नागरी सुविधांचा अभाव याबाबत त्या सातत्याने सकारात्मक भूमिका घेताना दिसतात.

सेवा, समर्पण आणि पारदर्शकता ही त्यांच्या कार्याची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे स्थानिक नागरिकांकडून सांगितले जाते.

त्यांच्या कुटुंबालाही सार्वजनिक जीवनाचा प्रदीर्घ अनुभव असून, ग्रामपंचायत व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विकासकामांची भक्कम पार्श्वभूमी लाभलेली आहे.

प्रशासनाशी समन्वय साधण्याची क्षमता, कामाचा अनुभव आणि लोकांशी थेट संवाद साधण्याची सवय ही त्यांची बलस्थाने मानली जात आहेत. त्यामुळे निर्णय प्रक्रियेत जनतेचा सहभाग अधिक प्रभावी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सामाजिक कामांच्या माध्यमातून सौ. पोकळे यांनी महिलांच्या सक्षमीकरणावर विशेष भर दिला आहे. महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी मार्गदर्शन, गरजू कुटुंबांना मदत, तसेच आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छता विषयक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडी, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, नागरी सुविधा आणि सार्वजनिक सोयी-सुविधांबाबत त्या व्यवहार्य आणि दीर्घकालीन उपाययोजनांची भूमिका मांडतात.

"प्रभागातील प्रत्येक नागरिकाची समस्या ही माझी स्वतःची समस्या आहे. केवळ आश्वासने न देता, लोकसहभागातून प्रत्यक्ष कामे मार्गी लावण्यावर माझा भर राहील," असे मत सौ. अनिता चंद्रकांत पोकळे यांनी व्यक्त केले. पारदर्शकता, सातत्य आणि जबाबदारी या तत्त्वांवर काम करण्याचा त्यांचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सध्या सौ. अनिता चंद्रकांत पोकळे यांनी कोणत्याही राजकीय पक्षाचा अधिकृत झेंडा हाती घेतलेला नसला, तरी योग्य वेळी त्या एखाद्या पक्षात प्रवेश करून निवडणूक रिंगणात उतरण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे आगामी राजकीय घडामोडींमध्ये त्यांच्या भूमिकेकडे मतदारांसह राजकीय वर्तुळाचेही लक्ष लागून राहणार आहे.

प्रभाग क्रमांक ३४ मध्ये लोकाभिमुख, समन्वयातून काम करणारे आणि जबाबदार नेतृत्व नागरिकांना अपेक्षित असून, त्या पार्श्वभूमीवर सौ. अनिता चंद्रकांत पोकळे यांच्याकडे आशेने पाहिले जात आहे.

## राज्यात ६४ नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये नवे नगराध्यक्ष

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील विविध जिल्ह्यांतील नगरपरिषद व नगरपंचायतींमध्ये नुकत्याच पार पडलेल्या नगराध्यक्ष निवडीत एकूण ६४ नगरपालिकांमध्ये नवे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. या निवडणुकांमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचे वर्चस्व दिसून आले.

भाजपने सर्वाधिक ठिकाणी नगराध्यक्षपद मिळवले असून चंदगड, अनगर, जामनेर, दोंडाईचा, मेढा, तळेगाव, वाई, जिंतूर, म्हसवड, मैंदर्गी, सावंतवाडी, गेवराई, देवळाली प्रवरा, अक्कलकोट, धामणगाव, पेण, सासवड, मंगळवेढा, तुळजापूर, वैजापूर, अंबरनाथ आदी ठिकाणी भाजप किंवा भाजप पुरस्कृत उमेदवार विजयी झाले.

शिवसेना (शिंदे गट) ने हातकणंगले, मुखेड, पालघर, मालवण, कळमनुरी, विटा, चिपळूण, डहाणू, पैठण, सिल्लोड, माथेरान, बुलढाणा, खोपोली आदी नगरपालिकांमध्ये सत्ता मिळवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने औसा, गंगापूर, जेजुरी, इंदापूर, भोर, गंगाखेड, रोहा, वडगाव मावळ, महाबळेश्वर आदी ठिकाणी नगराध्यक्षपद पटकावले. राष्ट्रवादी (शरद पवार गट) ने उरण व इस्लामपूर (उरूण–ईश्वरपूर) येथे विजय मिळवला.

दरम्यान, काँग्रेसने राजापूर, कन्नड व खुलताबाद येथे, तर शेकापने अलिबाग येथे यश मिळवले. मराठवाडा जनहित पार्टीने धर्माबाद व बिलोली नगरपंचायतीत विजय मिळवला. काही ठिकाणी स्थानिक आघाड्या व पॅनेलनेही सत्ता मिळवली आहे.

## लाला जावळकरांना वाड्या-वस्त्यांतून उत्स्फूर्त पाठिंबा

### भेट दौऱ्यात विकासावर शिक्कामोर्तब; 'विजयी गुलाल आपलाच'चा नारा

**खानापूर-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

खानापूर गणातील राजकीय वातावरण तापत असताना माजी सरपंच शरद लाला जावळकर यांना सर्वसामान्य जनतेकडून वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. भेठ दैरा गावासह परिसरातील वाड्या-वस्त्यांमध्ये जावळकर यांच्या भेटीदरम्यान नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.



गावपातळीवरील प्रश्न, शेती, रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे नेतृत्व म्हणून लाला जावळकर यांची ओळख आहे. सरपंचपदाच्या कार्यकाळात त्यांनी केलेली विकासकामे आजही जनतेच्या स्मरणात असून, त्याच कामांची पोचपावती म्हणून हा पाठिंबा मिळत असल्याचे बोलले जात आहे.

भेठ दैरा गावात झालेल्या बैठकीत ग्रामस्थ, युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. 'नेतृत्व शब्दात नव्हे तर कामात दिसते' अशी भावना व्यक्त करत नागरिकांनी जावळकर यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

**"लाला, तू डोळे झाकून राहा... कसलीही काळजी नको! विजयी गुलाल आपलाच!"**

या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह संचारला असून खानापूर गणात जावळकर यांच्या विजयाबाबत आत्मविश्वास वाढत आहे. वाड्या-वस्त्यांमधून मिळणारा प्रतिसाद हा केवळ प्रचारापुरता मर्यादित नसून, जनतेच्या मनातील विश्वासाचे प्रतीक असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. खानापूर गणात विकास, पारदर्शकता आणि जनतेशी थेट संवाद साधणारे नेतृत्व पुन्हा एकदा पुढे येत असल्याचे संकेत या पाठिंब्यामुळे मिळत आहेत.

# जेजुरीत अजित पवारांचाच भंडारा

## भाजपला अवघ्या दोन जागा



**जेजुरी (दै. आरंभ पर्व)**

तीर्थक्षेत्र जेजुरी नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस ने एकतर्फी विजय मिळवत भंडारा उधळला असून जेजुरीकरांनी भाजपला नाकारले. भाजपाला अवघ्या दोन जागांवर समाधान मानावे लागले. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाने २० पैकी १७ जागा जिंकल्या. एका जागेवर अपक्ष उमेदवाराने बाजी मारली. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जयदीप बारभाई हे विजयी झाले आहेत. त्यांनी मागील पराभवाची या निवडणुकीत परतफेड केली. भाजप चे सचिन सोनवणे यांचा त्यांनी मोठ्या मताधिक्याने पराभव केला. बारभाई यांना ७३०४ मते मिळाली तर सोनवणे यांना३७८९ मते मिळाली. निवडणुकीत शिंदे सेनेला एकही जागा मिळाली नाही. सेनेच्या नगराध्यक्षपदाचे उमेदवार दिनेश सोनवणे यांना ११६५ मते मिळाली.

आज जेजुरी नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येथील मल्हार नाट्यगृहात सकाळी दहा वाजता मतमोजानीला सुरुवात झाली. दहा टेबल आणि दोन फेऱ्यात संपूर्ण मतमोजणी करण्यात आली. पहिल्या फेरीतच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवारासह २० पैकी १७ उमेदवार आघाडीवर होते. दुसऱ्या फेरीत ही त्यांची आघाडी वाढत गेली. अंतिम निकाल हाती आला त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस चे नगराध्यक्षासह १७ उमेदवार विजयी झाले. भाजप ला प्रभाग ८ मधील केवळ दोन जागा तर प्रभाग ३ मध्ये अपक्ष उमेदवार विजयी झाला.

गेल्या निवडणुकीत भाजप हा पक्ष निवडणुकीत कुठे दिसलाच नाही. नव्याने काँग्रेस मधून भाजप मध्ये प्रवेश करणारे माजी आमदार संजय जगताप यांनी काँग्रेस च्या माध्यमातून नगराध्यक्ष पदासह १७ पैकी ११जागा जिंकून राष्ट्रवादी काँग्रेसच्या हातून सत्ता हिसकावून घेतली होती. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसने या पराभवाची परतफेड केली. माजी नगराध्यक्षा वीणा सोनवणे यांना ही पराभवाला सामोरे जावे लागले. या निवडणुकीत मात्र जेजुरी करांनी भाजपला पूर्णपणे नाकारले आहे.



## अभिनेता हर्षवर्धन राणे पुण्यात; भावनिक नातं व्यक्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अभिनेता हर्षवर्धन राणे अलीकडेच पुण्यात दाखल झाले. यावेळी त्यांनी पुणे शहराशी असलेलं आपुलकीचं आणि भावनिक नातं व्यक्त केलं. हर्षवर्धन यांनी सांगितलं की, भारतातील उत्तम हवामान असलेल्या शहरांमध्ये पुणे दुसऱ्या क्रमांकावर आहे, त्यामुळे हे शहर त्यांच्या आवडीच्या ठिकाणांपैकी एक आहे. ते म्हणाले की, त्यांच्या बालपणाचा काही महत्त्वाचा काळ पुण्यात गेला असून, त्यामुळे पुन्हा पुण्यात येणं त्यांच्यासाठी नेहमीच भावनिक आणि आठवणींनी भरलेलं असतं. या दौऱ्यादरम्यान हर्षवर्धन यांनी पुण्यातील खाद्यसंस्कृतीचंही कौतुक केलं. विशेषतः त्यांनी बरक्का रेस्टॉरंटचा उल्लेख करत, तिथलं स्वादिष्ट अन्न, संगीत आणि एकूणच वातावरणाची प्रशंसा केली. निसर्गप्रेमी असलेल्या हर्षवर्धन राणे यांनी सांगितलं की, नवीन वर्षाचं स्वागत गर्दीच्या ठिकाणी करण्यापेक्षा जंगलात आणि निसर्गाच्या सान्निध्यात करणं त्यांना अधिक आवडतं. तसेच महाराष्ट्रात अनेक सुंदर आणि निसर्गरम्य ठिकाणं असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

# भाजपमधील 'इनकमिंग' म्हणजे नेमकं काय?

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकारण वेगाने हालचाली करत आहे. विशेषतः भारतीय जनता पक्षात (भाजप) सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणातील पक्षप्रवेशांनी राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडवून दिली आहे. माजी नगरसेवक, विरोधी पक्षातील प्रबळ उमेदवार, तसेच आमदारांचे निकटवर्तीय भाजपमध्ये प्रवेश करत असल्याने प्रश्न उपस्थित होतो-ही केवळ संघटन वाढ आहे की विरोधकांना संपवण्याची दीर्घकालीन रणनीती?

2017 मध्ये पुणे महापालिकेवर एकहाती सत्ता मिळवलेल्या भाजपचा यावेळी उद्देश केवळ सत्ता टिकवण्यापुरता मर्यादित नसून, महापालिकेत प्रभावी विरोधी पक्षच उरू नये, अशा दिशेने पक्षाची वाटचाल सुरू असल्याचे चित्र दिसते. स्थायी समितीसारख्या महत्त्वाच्या आर्थिक निर्णय घेणाऱ्या समित्यांमध्ये विरोधी पक्षाचा एकही सदस्य नको, अशी आखणीच जणू सुरू आहे.

खडकवासला, वडगाव शहरी, खराडी, बावधन, बालेवाडी अशा मतदारसंघांमध्ये भाजपने नेमके तेच चेहरे पक्षात घेतले आहेत, ज्यांना पराभूत करणे भाजपच्या स्थानिक उमेदवारांना कठीण ठरू शकले असते. "जिथे आपला उमेदवार निवडून येऊ शकत नाही, तिथे विरोधकालाच आपल्याकडे घ्या"-हीच रणनीती प्रत्यक्षात उतरवली जात असल्याचे जाणकारांचे मत आहे.

या घडामोडींचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे 2029 च्या विधानसभा निवडणुकांची तयारी. आजचा पक्षप्रवेश हा केवळ महापालिकेपुरता मर्यादित नसून, पुढील पाच-दहा वर्षांचे राजकीय गणित डोळ्यासमोर ठेवून केलेला असल्याचे स्पष्ट होते. काही मतदारसंघांमध्ये भाजपकडे आता एक नव्हे तर तीन-तीन प्रबळ दावेदार तयार होत आहेत. यामुळे भविष्यातील अंतर्गत स्पर्धा आणि नाराजी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मात्र, भाजपच्या बाबतीत एक वास्तव कायम अधोरेखित केलं जातं- भाजपचा मतदार हा उमेदवारापेक्षा चिन्हाशी निष्ठावंत असतो. त्यामुळे अंतर्गत नाराजी, बंडखोरी किंवा दुफळीचा फटका पक्षाला तुलनेने कमी बसतो, असा आजवरचा अनुभव आहे. "कमळ उभं केलं तरी निवडून येईल" ही म्हण याच मानसिकतेतून आली आहे.

दुसरीकडे, विरोधकांसमोर मात्र मोठं आव्हान उभं ठाकलं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी (दोन्ही गट), शिवसेना (दोन्ही गट) जर एकत्र आले, तर अनेक प्रभागांमध्ये भाजपला कडवी झुंज द्यावी लागू शकते. आकडेवारी पाहता, विरोधी मतांची बेरीज अनेक ठिकाणी भाजपपेक्षा जास्त असल्याचंही विश्लेषण समोर येतं. त्यामुळे भाजपची ही "इनकमिंग" रणनीती म्हणजे संभाव्य धोक्यांवर आधीच केलेली शस्त्रक्रिया आहे.

एकंदरीत, पुण्यातील भाजपमधील भरभरून सुरू असलेली इनकमिंग ही केवळ पक्षप्रवेशांची बातमी नसून, शहरातील लोकशाही, विरोधी पक्षांची भूमिका आणि आगामी निवडणुकांचे राजकारण यावर खोल परिणाम करणारी घडामोड आहे. हे राजकारण भाजपला पुन्हा निर्विवाद सत्ता देईल की विरोधकांना नव्या एकजुटीची संधी देईल-याचं उत्तर पुणेकर मतदारच लवकरच देणार आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पुण्यात साऊथ आफ्रिकन टूरिझम तर्फे 'कॉर्पोरेट थिंक टँक' चे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : साऊथ आफ्रिकन टूरिझमने आपला प्रमुख कॉर्पोरेट सहभाग उपक्रम कॉर्पोरेट थिंक टँक चे पाचवे पर्व सुरू ठेवत पुण्यात नुकतेच या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.यामध्ये 25 हून अधिक कॉर्पोरेट नेतृत्वाने सहभाग घेतला, जेथे त्यांना संकल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी आणि सहयोगाकरिता नवीन मार्गांचा शोध घेण्यासाठी अद्वितीय संधी मिळाली. चार शहरांमधील सिरीजचा भाग म्हणून हा उपक्रम साऊथ आफ्रिकन टूरिझम आणि भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रादरम्यान दृढ संबंध निर्माण करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. विचारशील चर्चासत्रे, सर्वोत्तम पर्यटन स्थळांचे प्रदर्शन आणि परस्परसंवादात्मक नेटवर्किंग सत्रांच्या माध्यमातून कॉर्पोरेट थिंक टँक व्यवसाय इव्हेण्ट्स, माइस (MICE) आणि विश्रांतीसाठी केल्या जाणाऱ्या प्रवासासाठी प्रमुख गंतव्य म्हणून दक्षिण आफ्रिकेच्या वाढत्या लोकप्रियतेला प्रकाशझोतात आणण्यासाठी धोरणात्मक प्लॅटफॉर्म आहे. पुणे साऊथ आफ्रिकन टूरिझमसाठी धोरणात्मक केंद्रित बाजारपेठ म्हणून उदयास आली आहे, ज्याला पुण्यातील आयटी, ऑटोमोटिव्ह, उत्पादन व शैक्षणिक क्षेत्रांमधील प्रबळ उपस्थितीचे, तसेच वाढत्या कॉर्पोरेट व तरूण व्यावसायिक पर्यटक वर्गाचे पाठबळ आहे. देशाबाहेर प्रवासासाठी वाढती मागणी आणि प्रवास, कॉन्फरन्सेस आणि विश्रांतीकरिता उत्साहवर्धक हॉलिडेप्रती वाढत्या रूचीसह साऊथ आफ्रिकन टूरिझमने पुणे शहराला दक्षिण आफ्रिकेमधील माइस व लिजर प्रवासासाठी उच्च क्षमता असलेली स्रोत बाजारपेठ म्हणून धोरणात्मकरित्या स्थित केले आहे.




### भारताचा पहिला 'बजाज पुणे ग्रँड टूर ट्रॉफी' जयपूरमध्ये अनावरण

जयपूर (आरंभ पर्व) : भारतात व्यावसायिक सायकलिंगच्या एका नवीन युगाचे प्रतीक असलेल्या, बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ च्या प्रतिष्ठित आणि वारसा-प्रेरित ट्रॉफीचे आज जयपूरमध्ये अनावरण करण्यात आले. राजस्थानच्या उपमुख्यमंत्री श्रीमती दिया कुमारी आणि पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्री जितेंद्र दुडी (आयएएस) (रोड रेसचे यजमान शहर) यांच्या उपस्थितीत हा भव्य समारंभ पार पडला. राजस्थानचे खासदार श्री मदन राठोड; राजस्थानचे क्रीडा सचिव डॉ. नीरज के. पवन (आयएएस); सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष श्री ओंकार सिंग; आणि राजस्थान सायकलिंग असोसिएशनच्या निवड समितीच्या अध्यक्षा श्रीमती सारिका चौधरी देखील या प्रसंगी उपस्थित होत्या. पुणे जिल्हा प्रशासनाने श्री जितेंद्र दुडी (IAS) यांच्या नेतृत्वाखाली आणि महाराष्ट्र सरकारच्या भक्कम पाठिंब्याने आयोजित केलेली बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ही भारतातील पहिली आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग रोड रेस आहे. ही देशातील पहिली UCI २.२ श्रेणीतील रोड रेस असेल, ज्यामध्ये जगभरातील अव्वल सायकलस्वार भारतीय भूमीवर स्पर्धा करतील. आव्हानात्मक मार्ग आणि समृद्ध सांस्कृतिक पार्श्वभूमीसाठी ओळखली जाणारी ही स्पर्धा पुणे आणि भारताला जागतिक सायकलिंग नकाशावर एक प्रमुख ठिकाण म्हणून स्थापित करेल.

### नाताळपासून ते नवीन वर्षाच्या जल्लोषापर्यंत : खास 'सेलिब्रेशन गाईड'

पुणे (आरंभ पर्व) : वर्षातील सर्वात जादुई काळ जवळ येत असताना, पुणे शहर लखलखाट, उत्सव आणि उत्साही ऊर्जेने भारलेलं दिसत आहे. नाताळच्या सुरांनी निनादणारी ठिकाणं, उबदार वातावरण, झगमगती सजावट, थिरकणारे डान्स फ्लोअर्स आणि मध्यरात्रीचे रोमांचक काउंटडाउन—पुण्यातील ख्रिसमस आणि नववर्षाचा काळ म्हणजे मित्र-परिवारासोबत आनंद साजरा करण्याचा उत्सवच आहे. या नववर्षी बुकमायशो आपल्या खास मोहिमेद्वारे तुम्हाला असे संकल्प करण्याचं आवाहन करत आहे, 'जे तुम्ही खरंच पूर्ण करू शकाल'. संकल्प सोपे ठेवा: फक्त एकच असा संकल्प करा ज्यावर तुम्ही खरोखर ठाम राहाल. तुमची आवडती निवड शोधताना, तुमच्या स्वप्नातील उत्सवात नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येचा आनंद घ्या. शहर रूफटॉप्स, डान्स फ्लोअर्स, सणांचे कार्निव्हल्स आणि आलिशान पार्ट्यांच्या अनुभवांनी गजबजलेले असताना, तुमची ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येचे नियोजन करण्याची हीच योग्य वेळ आहे. तुम्ही एका शांत आणि उबदार नाताळच्या सेलिब्रेशनची वाट पाहत असाल किंवा संपूर्ण शहरातील धमाकेदार पार्ट्यांसह नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी उत्सुक असाल, बुकमायशोने तुमच्यासाठी सर्वात रोमांचक कार्यक्रम खास निवडले आहेत.या नाताळात कोपा मॉल, पुणे येथील सॅन्टास्टिक वर्ल्डमध्ये एका जादुई जगात प्रवेश करा! सणासुदीच्या आनंदाची एक अद्भुत दुनिया तुमची आणि तुमच्या कुटुंबाची वाट पाहत आहे, जी मनमोहक सजावट, आनंददायी उपक्रम आणि नाताळच्या उबदार वातावरणाने भरलेली आहे. सुट्टीतील अविस्मरणीय आठवणी तयार करू पाहणाऱ्या कुटुंबांसाठी योग्य असलेले सॅन्टास्टिक वर्ल्ड सर्व वयोगटांसाठी काहीतरी खास देते. या आणि या सणाच्या उत्साहात स्वतःला झोकून द्या! फिनिक्स मार्केटसिटी, पुणे येथे 'फिनिक्स ख्रिसमस वंडरलँड 2.0' सह सर्वात भव्य नाताळ उत्सवाचा अनुभव घ्या. हा प्रेक्षणीय सोहळा लखलखते दिवे, सणासुदीची सजावट, लाईव्ह मनोरंजन आणि अनेक कौटुंबिक उपक्रमांचे आश्वासन देतो. खरेदीदार आणि कुटुंबांसाठी योग्य असलेला हा सुट्टीतील एक तल्लीन करणारा अनुभव आहे, ज्यामध्ये तुम्ही या सणासुदीच्या काळातील जादूचा आनंद घेऊ शकता. पुण्यातील उत्साही सणासुदीची बाजारपेठ 23–25 डिसेंबर दरम्यान चालणार आहे, जिथे अभ्यागत फॅशन, लाइफस्टाइल, होम डेकोर आणि अनोख्या भेटवस्तूंचे 100+ स्टॉल्स पाहू शकतात, जागतिक खाद्यपदार्थ, लाईव्ह संगीत आणि सादरीकरणाचा आनंद घेऊ शकतात.

## जाहिरातीलाच नकार घंटा आल्यास
# दैनिकांचे आर्थिक गणिते कसे टिकणार?
### जानेवारी २०२६ पासून छोटी दैनिके आक्रमक निर्णयाच्या पवित्र्यात

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वृत्तपत्र म्हणजे केवळ बातम्यांचा संग्रह नाही; ते लोकशाहीचे पहारेकरी, समाजाचे आरसे आणि सत्तेला प्रश्न विचारणारे व्यासपीठ आहे. मात्र या सगळ्या जबाबदाऱ्यांच्या मुळाशी एक कठोर वास्तव दडलेले आहे-आर्थिक गणित. छपाई, कागद, वितरण, कर्मचारी, वार्तांकन, तंत्रज्ञान... या साऱ्या खर्चांची बेरीज करताना दैनिकांचे गणित मुख्यतः जाहिरातींवर उभे असते. अशा वेळी "जाहिरातीलाच नकार घंटा" वाजू लागली, तर या गणिताचा पाया डळमळीत होतो.

जाहिरात ही दैनिकांची ऑक्सिजन नळी आहे. ती थांबली, कमी झाली किंवा अटी-शर्तींच्या कचाट्यात अडकली, तर संपादकीय स्वातंत्र्यावर अनाहूत दबाव येतो. प्रश्न विचारणारी बातमी, अस्वस्थ करणारा स्तंभ किंवा सत्ताधाऱ्यांना आरसा दाखवणारा लेख-यांची किंमत अनेकदा जाहिरातींच्या कपातीने वसूल केली जाते. परिणामी, दैनिकांसमोर निवड उरते: सत्याचा पाठपुरावा की आर्थिक तग धरणे?

आजचा काळ हा केवळ स्पर्धेचा नाही, तर असमतोलाचा आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म्सनी जाहिरात बाजाराचा मोठा हिस्सा गिळंकृत केला आहे. उरलेल्या जाहिरातींसाठी छापील माध्यमांना दरकपात, सवलती आणि 'अनुकूलता' यांचा मार्ग धरावा लागतो. सरकारी जाहिरातींवर अवलंबित्व वाढले की, त्याबरोबर अपेक्षाही वाढतात-कधी उघड, कधी सूचक. अशा वातावरणात निर्भीड पत्रकारिता टिकवणे हे तलवारीच्या धारेवर चालण्यासारखे आहे.

> **शेवटी प्रश्न एवढाच आहे**
> **जाहिरातींच्या नकारघंटा वाजत राहिल्या, तर दैनिके केवळ तग धरतील का, की आपली आत्मा गमावतील? उत्तर आपल्या सामूहिक निर्णयांत दडलेले आहे- वाचक, जाहिरातदार आणि माध्यमे-सगळ्यांनी मिळून लोकशाहीच्या या महत्त्वाच्या स्तंभाला आधार दिला, तरच आर्थिक गणिताबरोबर मूल्यांचे गणितही तग धरू शकेल.**

याचा थेट परिणाम वाचकांवरही होतो. खर्च आवरण्यासाठी पानसंख्या कमी होते, स्थानिक वार्तांकनावर कात्री बसते, अनुभवी पत्रकारांच्या जागी कमी खर्चिक पर्याय शोधले जातात. दीर्घकाळात हे सर्व लोकशाहीसाठी धोक्याचे ठरते. कारण मजबूत दैनिके म्हणजे सजग नागरिक, आणि सजग नागरिक म्हणजे सक्षम लोकशाही.



मग मार्ग कोणता? एकाच उत्तराने हा प्रश्न सुटणार नाही. जाहिरात महसुलावरचे एकाधिकार अवलंबित्व कमी करणे, सदस्यत्व मॉडेल्स मजबूत करणे, स्थानिक व्यवसायांसोबत पारदर्शक भागीदारी करणे, वाचकांचा विश्वास भांडवल म्हणून जपणे-हे सगळे पर्याय एकत्र राबवावे लागतील. त्याचवेळी जाहिरात देणाऱ्यांनीही माध्यमांची भूमिका समजून घेणे गरजेचे आहे. टीका म्हणजे वैर नव्हे, प्रश्न म्हणजे शत्रुत्व नव्हे-हे भान दोन्ही बाजूंनी पाळले गेले, तरच समतोल साधता येईल.

## पुणे महापालिकेच्या सर्व १६५ जागा स्वबळावर लढवणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


सनय छत्रपती शासन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. नामदेवराव जाधव यांनी पुणे येथील पत्रकार भवनात आयोजित पत्रकार परिषदेत आगामी महानगरपालिका निवडणुकांबाबत महत्त्वपूर्ण आणि धक्कादायक घोषणा केल्या. "शहर करू सिंगापूर" या धोरणाअंतर्गत सनय छत्रपती शासन पक्ष पुणे महानगरपालिकेच्या सर्व १६५ जागा स्वबळावर लढवणार असल्याची स्पष्ट माहिती त्यांनी दिली. याच धर्तीवर राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुकाही पक्ष स्वबळावर लढवणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

पत्रकार परिषदेत बोलताना प्रा. जाधव यांनी पुणे जिल्ह्यातील वाढत्या प्रदूषणाचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. सध्या पुणे जिल्ह्याचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक (AQI) तब्बल ३१६ इतका धोकादायक पातळीवर पोहोचला असून, सिंगापूरमध्ये तो केवळ १२ ते १५ दरम्यान आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. या वाढत्या प्रदूषणाचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, पुणे जिल्ह्यातील नागरिकांचे सरासरी आयुर्मान सुमारे २० वर्षांनी घटत असल्याची अत्यंत गंभीर बाब त्यांनी अधोरेखित केली.



- **'शहर करू सिंगापूर'चा संकल्प – प्रा. नामदेवराव जाधव**

### पक्ष वाटचालीस शुभेच्छा




**सनय छत्रपती शासन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. नामदेवराव जाधव यांची दैनिक आरंभ पर्वच्या मुख्य संपादिका सुरेखा मते यांनी सदिच्छा भेट घेऊन पक्षाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी फिटनेस कोच नरेंद्र आवटे उपस्थित होते.**

## समृद्धीसाठी भारताने संस्कृतिक मूल्यांना महत्त्व देणे आवश्यक

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

"इनोव्हेशन, सेल्फ रिलायन्स अँड प्रॉस्पेरिटी" या संकल्पनेवर आधारित 'वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरम (डब्ल्यूएचइएफ) २०२५' या दोन दिवसीय परिषदेचे उद्घाटन शुक्रवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले. याप्रसंगी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. मोहन यादव, 'डब्ल्यूएचइएफ'चे संस्थापक स्वामी विज्ञानंद, 'डब्ल्यूएचइएफ'च्या आयोजन समितीचे अध्यक्ष श्री. राजेश शर्मा आणि श्री. हरी मोहन बांगुर, अध्यक्ष, श्री सिमेंट लि.; श्री. सज्जन जिंदाल, अध्यक्ष, जेएसडब्ल्यू समूह आदी आघाडीचे उद्योगपती, धोरणकर्ते, स्टार्टअपचे संस्थापक, व्यावसायिक नेते आणि गुंतवणूकदार उपस्थित होते.

भारतात असलेली प्रतिभा, संसाधने आणि तंत्रज्ञान आदी अंगभूत सामर्थ्यांवर भर देत, भारताला नेतृत्व किंवा प्रेरणा घेण्यासाठी बाहेर पाहण्याची तथा इतर देशांवर अवलंबून राहण्याची गरज नाही, असे प्रतिपादन श्री. हरी मोहन बांगुर यांनी केले. हे भाषण उद्घाटन सत्राचे मुख्य आकर्षण ठरले. या वेळी श्री. बांगुर यांनी महाराष्ट्रात २,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याबाबतचे आशयपत्र मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले. नवकल्पनांबद्दल बोलताना, श्री. बांगुर यांनी ऊर्जा कार्यक्षमतेतील तांत्रिक प्रगतीबाबत 'श्री सिमेंट'चा दाखला या वेळी दिला. 'भारतातील वीज निर्मिती केंद्रांत साधारणपणे 60 टक्क्यांपेक्षा कमी क्षमतेने उत्पादन झाल्यास ते बंद पडतात किंवा पाडले जातात. या पार्श्वभूमीवर आमच्या अभियंत्यांनी काही अभिनव बदल केले आणि क्षमता वापराची मर्यादा कमी केली, ज्यामुळे आम्ही आमचे वीज प्रकल्प ३० टक्के क्षमतेवर चालवू शकलो. यामुळे कोळशाचा मोठा अपव्यय टळला.



# प्रशासनाचा गोंधळ, नागरिकांचा कोंडमारा !
### उड्डाणपुलानंतर पुन्हा तोडफोड, मेट्रोच्या नावाखाली कररूपी पैशांची उधळपट्टी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोडवरील प्रशासकीय कारभाराचा बोजवारा उडाल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. अवघ्या सहा महिन्यांपूर्वी मोठ्या थाटामाटात उद्घाटन करून वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेल्या उड्डाणपुलालाच आता तोड देऊन त्यावर मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याचा घाट घालण्यात आला आहे. नियोजनशून्य, गोंधळलेला आणि नागरिकांना वेठीस धरणारा हा निर्णय म्हणजे जनसामान्यांच्या कररूपी पैशांची सरळसरळ उधळपट्टी असल्याचा संताप परिसरात व्यक्त होत आहे.

मेट्रो प्रकल्पाचे काम आधीपासूनच कासवगतीने सुरू असून, आता उड्डाणपुलाच्या पिलरवरील तोडफोड आणि जोडकामामुळे सिंहगड रोडवरील वाहतूक पुन्हा पूर्णपणे विस्कळीत होणार आहे. आधीच वाहतूक कोंडीने हैराण झालेले नागरिक आता तासनतास वाहनांच्या रांगेत अडकून राहणार आहेत. यामुळे नागरिकांचा अमूल्य वेळ, इंधनाचा खर्च वाया जाणार असून, कामावर जाणाऱ्या नोकरदारांपासून विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनाच याचा फटका बसणार आहे. मानसिक त्रास हा तर रोजचा नित्यक्रम बनणार आहे. या प्रशासकीय हलगर्जीपणाविरोधात सिंहगड रोड परिसरातील नागरिकांनी संतापाचा उद्रेक केला असून, लोकप्रतिनिधींनीही थेट प्रशासनाला धारेवर धरले आहे. काँग्रेस पक्षाचे अविनाश खंडारे यांनी हा निर्णय म्हणजे 'आधी पूल बांधा आणि नंतर डोकं चालवा' अशा कारभाराचे जिवंत उदाहरण असल्याची तीव्र टीका केली आहे. तसेच काँग्रेस पक्षाचे पुणे शहर प्रदेश सचिव आबा जगताप यांनी, मेट्रोचे नियोजन आधी का झाले नाही, असा थेट सवाल उपस्थित करत नागरिकांच्या संयमाचा अंत होऊ नये, याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी केली आहे.



दरम्यान, शिवसेनेचे बाळासाहेब कदू यांनी प्रशासनावर जोरदार हल्लाबोल करत, हा प्रकार म्हणजे जनतेच्या पैशांवर डल्ला असल्याचा आरोप केला आहे. तर शिवसेनेचे विश्वजीत कोंडे यांनी सिंहगड रोडवरील नागरिकांना वेठीस धरणारा हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल, असा स्पष्ट इशारा दिला आहे.

> **विशेष म्हणजे, याच उड्डाणपुलावर विद्युत रोषणाई करण्यासाठी तब्बल दोन कोटी रुपयांच्या निवेदनास मान्यता देण्यात आली आहे. पुलाच्या भवितव्याबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असताना आणि मेट्रोच्या नावाखाली सुरू असलेल्या या गोंधळात, अशी विद्युत रोषणाई नेमकी कुठल्या उपयोगाची आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**

उड्डाणपूल उभारणीच्या वेळीच मेट्रोचा विचार का केला गेला नाही, असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. आधी पूल उघडायचा, नंतर त्यालाच तोडायचा, हा कोणता विकास, असा संतप्त सवाल सिंहगड रोड परिसरात घुमत आहे. प्रशासनाने तात्काळ या निर्णयाचा फेरविचार करून नागरिकांना दिलासा न दिल्यास, या विरोधाचा आवाज अधिक तीव्र होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# मुलींनाच बंधने का?


**(दै. आरंभ पर्व)**

**समाज प्रगत होत आहे, काळ बदलतो आहे, तंत्रज्ञानाने जग जवळ आले आहे; पण या सगळ्या बदलांच्या गर्दीत एक प्रश्न मात्र आजही तसाच उभा आहे - मुलींनाच बंधने का?**

हा प्रश्न केवळ एका घराचा नाही, तो संपूर्ण समाजाच्या मानसिकतेवर बोट ठेवणारा आहे.

घरात जन्म झाल्यापासूनच मुलगी वेगळ्या चौकटीत बसवली जाते. "हस जरा कमी", "उंच बोलू नकोस", "संध्याकाळी बाहेर जाऊ नकोस", "कपडे नीट घाल", "लोक काय म्हणतील?" अशा सूचना तिच्या लहानशा वयातच कानावर पडू लागतात. मुलगा मात्र मोकळा - खेळायला, फिरायला, चुका करायला. चूक मुलाकडून झाली तर ती "खोड" ठरते; मुलीकडून झाली तर "चारित्र्याचा प्रश्न" बनतो. हा फरक कुठून आला?

मुलीच्या सुरक्षिततेच्या नावाखाली बंधने घातली जातात.



पण प्रश्न असा आहे की, सुरक्षिततेची जबाबदारी नेहमी मुलीवरच का? रस्त्यावर त्रास होतो म्हणून मुलीने बाहेर जाऊ नये? चुकीची नजर टाकली जाते म्हणून तिनेच स्वतःला झाकावे? इथे दोषी कोण - मुलगी की समाजाची विकृत मानसिकता? गुन्हा करणाऱ्याला मोकळे सोडायचे आणि संभाव्य बळीला कैदेत ठेवायचे, हा कोणता न्याय?

शिक्षणाच्या बाबतीतही हीच कथा. "जास्त शिकून काय करणार?", "लग्न झाल्यावर घरच सांभाळायचंय ना!", "इतक्या दूर कॉलेजला जायची गरज नाही" - ही वाक्यं अनेक मुलींची

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

स्वप्नं अंकुरातच तोडतात. मुलगा शिकायला बाहेरगावी गेला तर अभिमान वाटतो; मुलगी गेली तर भीती, शंका आणि कुजबुज सुरू होते.

लग्नाच्या बाबतीत तर मुलीचे आयुष्यच जणू समाजाच्या हाती दिले जाते. वेळेआधी लग्नाचा घाईघाईने विचार, तिच्या मताला दुय्यम स्थान, करिअरपेक्षा संसाराला प्राधान्य - हे सगळे 'परंपरा' या नावाखाली सहज स्वीकारले जाते. मुलगा उशिरा लग्न करतो, करिअर घडवतो, अनुभव घेतो; मुलगी मात्र 'वेळ निघून जाईल' या भीतीत बांधली जाते.

खरं तर बंधनं मुलींना नाही, तर समाजाच्या असुरक्षित मानसिकतेला घालायला हवीत. कारण प्रश्न मुलीच्या स्वातंत्र्याचा नाही, तर समाजाच्या जबाबदारीचा आहे. मुलींना सतत 'जपून' राहायला सांगण्यापेक्षा मुलांना 'जबाबदारीने' वागायला शिकवणे गरजेचे आहे. आदर, समानता आणि संवेदनशीलता ही मूल्ये घरातूनच रुजली, तर बंधनांची गरजच उरणार नाही.

आजच्या मुली शिकत आहेत, स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत, कुटुंब आणि समाज दोन्ही पातळ्यांवर योगदान देत आहेत. तरीही त्यांना सतत स्वतःला सिद्ध करावे लागते. स्वप्न पाहण्याचा अधिकार, निर्णय घेण्याचा अधिकार आणि मोकळेपणाने जगण्याचा अधिकार हा फक्त मुलांचाच मक्ता नाही; तो मुलींचाही तितकाच आहे.

मुलींनाच बंधने का? हा प्रश्न विचारण्यापेक्षा, बंधनेच का? असा प्रश्न विचारण्याची वेळ आता आली आहे. कारण जिथे समानता असते, तिथे भीती नसते; आणि जिथे भीती नसते, तिथे समाज खऱ्या अर्थाने प्रगत होतो.




## सुंबा आर्टफेस्ट २०२५ मध्ये कलानिधी पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन,घोले रोड येथे सुंबरान आर्ट फाऊंडेशन तर्फे आयोजित सुंबा आर्टफेस्ट 2025 मध्ये कलानिधी पुरस्कार प्रदान करण्यात आले.पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल पद्मश्री वासुदेव कामत व पद्मश्री अच्युत पालव या दोन दिग्गज कलाकारांचा ट्रस्टमार्फत या सोहळ्यात सन्मान करण्यात आला.एथनोग्राफी छायाचित्रकार श्री. श्रीकृष्ण परांजपे यांना कलानिधी कृतज्ञता पुरस्कार २०२५ तसेच कागदी शिल्पकार व चित्रकार श्री. सतीश घाटपांडे व व्हीनस ट्रेडर्स चे संचालक सुरेंद्रभाई करमचंदानी यांना कलानिधी कलागौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी चैत्रा क्रिएशन्सच्या संस्थापिका व उद्योजिका तसेच कै. प्रा. गुरव यांच्या कन्या चित्रा मेटे उपस्थित होत्या. ज्येष्ठ चित्रकार कै.प्रा.रावसाहेब गुरव यांच्या स्मरणार्थ आयोजित सुंबा आर्टफेस्ट 2025 चे 22 डिसेंबर पर्यंत सुरू राहणार असून आदिवासी कलाकृती लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न आहे. या महोत्सवात पद्मश्री पुरस्कार प्राप्त कलाकार अच्युत पालव आणि वासुदेव कामत यांच्या प्रेरणादायी थेट कला सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. अच्युत पालव यांनी कॅलिग्राफीचे प्रत्यक्ष सादरीकरण केले. या कार्यक्रमात वासुदेव कामत यांनी अच्युत पालव यांच्या उपस्थितीत त्यांचे थेट चित्र रेखाटले.